मंगळवार, १३ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १७५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 13 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-175 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# अशोक चव्हाणांचा काँग्रेसला रामराम

## पुढील राजकीय निर्णय २ ते ३ दिवसांत घेणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्रथम सदस्यत्वाचा राजीनामा सोमवारी दिला. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना अशोक चव्हाण यांनी पत्र लिहिले आहे. या पत्राच्या माध्यमातून त्यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. मागच्या काही दिवसांपासून चव्हाण काँग्रेस पक्षात नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. शिवाय ते भाजपमध्ये प्रवेश करतील, अशीही चर्चा होत होती. दरम्यान, चव्हाण यांच्या राजीनाम्यामुळे राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे.**



राजीनामा दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना अशोक चव्हाण म्हणाले की, माझ्यासाठी पक्षाने खूप केले पण मी देखील पक्षासाठी खूप कष्ट घेतले. जन्मापासून आतापर्यंत काँग्रेसचं काम केलं. आता अन्य पर्याय पाहिले पाहिजेत यासाठी मी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिला. त्याचवेळी भाजपप्रवेशाचा निर्णय आणखी मी घेतलेला नाही. माझ्या पुढील राजकीय निर्णयासाठी २ ते ३ दिवसांचा अवधी लागेल, असं सूचकपणे त्यांनी सांगितलं. विशेष म्हणजे गृहमंत्री अमित शाह १५ तारखेला महाराष्ट्र दौऱ्यावर येतायेत. त्याचवेळी अशोक चव्हाण भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. तसे संकेतही अशोक चव्हाण यांनी आपल्या बोलण्यातून दिले. काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर प्रथमच अशोक चव्हाण प्रसारमाध्यमांसमोर आले. ज्या काँग्रेस पक्षाने तुम्हाला मुख्यमंत्रिपदावर बसवलं, महत्त्वाची मंत्रिपदे दिली तो पक्ष सोडण्याचं कारण काय? आता पुढे कोणत्या पक्षात प्रवेश करणार? अशा प्रश्नांचा भडीमार पत्रकारांनी चव्हाण यांच्यावर केला. त्यावेळी राजीनाम्यामागची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. मी काँग्रेस पक्षाचा प्राथमिक सदस्यत्वाचा आणि विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला आहे. प्रत्येक गोष्टीला काही कारण असावंच असं नाही. काँग्रेसमध्ये होतो तोपर्यंत पक्षाचे प्रामाणिकपणे काम केलेले आहे. कोणाबद्दलही व्यक्तिगत माझ्या मनात वेगळी भावना नाही. यापुढची राजकीय दिशा ठरविण्यासाठी एक दोन दिवसांचा अवधी लागेल. पुढच्या दोन दिवसांत माझी राजकीय भूमिका स्पष्ट करेन. परंतु भाजपमध्ये जाण्याचा अद्याप निर्णय नाही, असं अशोक चव्हाण यांनी सांगितलं.असे सांगतानाच काँग्रेस पक्षातील अन्य कोणत्याही आमदारासोबत चर्चा झालेली नाही, असंही त्यांनी सांगितलं. भाजप प्रवेश हा चांगला पर्याय वाटतोय का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर आणखी त्याबद्दल विचार केलेला नाही, असे उत्तर अशोक चव्हाण यांनी दिले. त्याचवेळी भाजपकडून आपण राज्यसभेवर जाणार आहात, अशा चर्चा असल्याचं पत्रकारांनी विचारल्यावर 'आणखी माझा राजकीय निर्णय झालेला नाही, पुढच्या २-३ दिवसांत निर्णय घेईन. राजीनामा देऊन तीन तास झालेत, असे म्हणून त्यांनी राज्यसभेवरील प्रश्नाला उत्तर देणे टाळले.

**काँग्रेसमध्ये जोरदार हालचाली :** अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्याची गंभीर दखल काँग्रेस हायकमांडकडून घेण्यात आली आहे . त्यामुळे काँग्रेस हायकमांडने महाराष्ट्रातील काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत . काँग्रेस आमदारांची येत्या 14 फेब्रुवारीला महत्त्वाची बैठक बोलवण्यात आली आहे . या बैठकीला काँग्रेसच्या सर्व आमदारांना उपस्थित राहण्याची सूचना देण्यात आली आहे . अशोक चव्हाण यांच्यासह जवळपास 10 आमदार भाजपमध्ये जाण्याची शक्यता आहे . त्यामुळे काँग्रेस हायकमांडकडून सूचना देण्यात आली आहे की, प्रत्येक आमदाराशी संपर्क करा .

**अशोक चव्हाण आदर्श घोटाळा लपविण्यासाठी भाजपमध्ये :** शिवसेना आणि राष्ट्रवादी निवडणूक आयोगाने चोरांच्या हातात दिली . आता काँग्रेस देखील अशोक चव्हाण यांच्या हातात देणार की काय ? असा टोला संभाजीनगरच्या दौऱ्यावर असलेल्या उद्ध ठाकरे यांनी लगावला . त्याचवेळी अशोक चव्हाण आदर्श घोटाळा लपविण्यासाठी भाजपमध्ये गेले असा आरोपही त्यांनी केला .

**काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्दैवी :** पक्षाने ज्यांना सर्वकाही दिले ते लोक पक्ष सोडून जात आहेत हे दुर्दैवी आहे . काँग्रेस पार्टी संविधान आणि लोकशाही वाचवण्याची लढाई लढते, असे नाना पटोले म्हणाले . काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि विचारधारेच्या जोरावर संघर्ष करु आणि भाजपला पराभूत करु, असे म्हणत पटोले पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने अनेक नेत्यांना खूप काही काही दिले आहे . आज काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई लढत असताना सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्दैवी आहे .

# माजी नौसैनिक भारतात परतले; विमानतळावर जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ज्या आठ माजी नौसैनिकांना कतारने फाशीची शिक्षा सुनावली होती, त्यांची सुटका करण्यात भारत सरकारला यश मिळालं आहे. भारत सरकारच्या प्रयत्नांमुळे तब्बल आठ वर्षभरानंतर ते भारतात परतले आहेत. त्यांच्यावर हेरगिरीचा आरोप ठेवण्यात आला होता. त्यामुळे त्यांना आधी फाशीची नंतर जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. परंतु, भारत सरकारने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करत त्यांची शिक्षा रद्द करून त्यांचा भारतात येण्याचा मार्ग मोकळा करून दिला. त्यामुळे या नौसैनिकांनी भारत सरकारचे आभार मानले आहेत. देशात परतलेल्या आठपैकी सात नौसैनिकांनी 'भारत माता की जय' म्हणत दिल्ली विमानतळावरून बाहेर पडले. आम्ही भारतात सुरक्षितपणे परतलो याचा आम्हाला खूप आनंद आहे. निश्चितपणे, आम्ही पंतप्रधान मोदींचे आभार मानू इच्छितो, कारण हे केवळ त्यांच्या वैयक्तिक हस्तक्षेपामुळेच शक्य झाले, असे त्यांच्यापैकी एकाने सांगितले. पंतप्रधान मोदींच्या हस्तक्षेपाशिवाय आम्हाला इथे पोहोचणे शक्य झाले नसते. आणि भारत सरकारच्या सततच्या प्रयत्नांमुळे हे घडले आहे, असेही एका नौसैनिकाने म्हटलं. आम्ही भारतात परत येण्यासाठी जवळजवळ १८ महिने वाट पाहिली. आम्ही पंतप्रधानांचे अत्यंत आभारी आहोत. त्यांच्या वैयक्तिक हस्तक्षेपाशिवाय कतारबरोबरचे त्यांचे समीकरण हे शक्य झाले नसते. आम्ही मनापासून भारत सरकारचे आभारी आहोत. भारत सरकारच्या प्रयत्नांशिवाय आजचा दिवस पाहता आला नसता, अशी प्रतिक्रिया एका नौसैनिकाने दिली. कतारमध्ये एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या भारताच्या आठ माजी नौदल अधिकाऱ्यांना कतारमधील एका कनिष्ठ न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली होती. २०२३ मधलं म्हणजेच गेल्यावर्षी प्रकाशात आलेलं हे प्रकरण आहे. कतारमधील यंत्रणेने त्यांना ३० ऑगस्ट २०२२ रोजी अटक केली होती. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने २६ ऑक्टोबर २०२३ रोजी या कतारने जो मृत्युदंडाचा निर्णय सुनावला होता त्याविषयी एक निवेदन जारी करून या निकालाबाबत चिंता व्यक्त केली. भारताच्या आठ माजी नौसैनिकांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्याचा निर्णय अनपेक्षित असून, आम्ही तपशीलवार निकालाच्या प्रतीक्षेत आहोत. आम्ही सर्व कायदेशीर पर्यायांचा वापर करून, त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करू असे त्यावेळी भारताने स्पष्ट केलं होतं. त्यानंतर आता आज या नौसैनिकांची सुटका झाली आहे.

# शरीफ यांचे सत्तेसाठी प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**इस्लामाबाद :** पाकिस्तानात कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळाले नसल्याने राजकीय गोंधळाची स्थिती आहे. इम्रान खान समर्थक अपक्षांना १०१ जागांवर विजय मिळाला असून त्यांच्या पक्षाने सत्तास्थापनेसाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ७५ जागांसह शरीफ यांचा पक्ष अधिकृतरित्या सर्वात मोठा असून त्यांनीही सरकार बनविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. इम्रान खानसमर्थकांनी रस्त्यावर येऊन आंदोलने सुरू केली असल्यामुळे परिस्थिती चिघळण्याची शक्यता आहे. खान यांच्या पक्षाचे समर्थक असलेले १०१ अपक्ष निवडून आल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या पक्षाने सत्तास्थापनेसाठी १३३चा आकडा गाठण्यासाठी त्यांना ३२ सदस्यांची आवश्यकता आहे. तर लष्कराने जाहीर पाठिंबा देऊ केलेले माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या पीएमएल-एन पक्षाने अन्य पक्षांशी बोलणी सुरू केली आहे.

# मायबाप सरकार...! दुष्काळी निर्णय फक्त कागदावरच का?

## जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्र्यांबरोबर पालकमंत्र्यांनाही दुष्काळाच्या दाहकतेचा विसर!

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे


धाराशिव : राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये यंदा अत्यल्प पावसामुळे राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये भीषण पाणी टंचाई जाणवत शेतीसाठी पूरक असणारा दुध व्यवसाय चारा टंचाई मूळे अडचणीत आला आहे. पावसाअभावी खरीप गेले, पाण्याची पातळी कमी झाल्याने रब्बी पिके धोक्यात आली. रब्बीचे शेतकऱ्याच नगदी पीक म्हणुन ओळखले जाणारा हरभरा उत्पन्न वातावरणातील बदला मूळे घटल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबींमुळे शेतकऱ्याला मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

यामुळे जिल्ह्यातील खरीप हंगाम 2023 मधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहाय्यक आयुक्त श्री. मोती राम यांच्यासह तीन सदस्यीय पथकाने 13 डिसेंबर रोजी जिल्ह्यात स्वतः च्या सोयीच्या ठिकाणी पाहणी दौरा केला पणं या दुष्काळी दौऱ्याला दोन महिने होऊनही याबाबत राज्य सरकार असो की केंद्र सरकार यांच्या कडून दुष्काळी परिस्थितीवर कधी ठोस पावले उचलणार यावरच बळीराजा आस लावून बसला आहे.



शासन निर्णयानुसार, "जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दुरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र आणि पिकांची स्थिती या सर्व घटकांचा विचार करून 15 जिल्ह्यातील 24 तालुक्यांमध्ये, गंभीर तर 16 तालुक्यांमध्ये मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर केला गेला राज्य सरकारच्या या निर्णयामुळे 40 तालुक्यामध्ये वेगवेगळया सवलती लागू करण्यात येणार होत्या त्यात जमीन महसुलात सूट, पीककर्ज पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती,कृषी पंपाच्या चालू विज बिलाबात 33.5% सूट शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुक्लात माफी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं तर त्यांना 2023च्या खरीप हंगामातील 7/12 उताऱ्यावरील पिकांच्या नोंदीच्या आधारे मदत दिली जाते. खरीप हंगामातील कोरडवाहू जमिनीवरील पिकांचं 33 टक्क्यांपेक्षा नुकसान झालं तर त्यांना मदत जाहीर केली. बहुवार्षिक फळपिके आणि बागायती पिकांचं 33 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालं त्याचा पंचनामा करावा. पण त्याआधी या पिकांची संबंधित शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर नोंद असणं आवश्यक आहे.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

महाभारतातील कर्णाचे उदाहरण इथे आठवते. कर्ण उदार होता,शूर होता पण आपल्या श्रेष्ठत्वाचा अहंकारही त्याला होता. माणसाला अहंकार असला की योग्यायोग्यतेचा विवेक त्याला राहत नाही. तो अधर्माने वागतो. युद्धात कर्णाच्या रथाचे चाक भूमीत रुतले. तेव्हा कर्ण अर्जुनाला म्हणतो, ' तू शूर आहेस, सदाचारी आहेस, धर्माने वागणारा आहेस. तेव्हा माझ्या रथाचे चाक निघेपर्यंत थांब. ' ते ऐकून श्रीकृष्ण कर्णाला म्हणाले, ' तुम्ही सगळ्यांनी मिळून अधर्माने एकट्या अभिमन्यूची हत्या केली. द्रौपदी वस्त्रहरण केले . अशा प्रसंगी तुला धर्म आठवला नाही. आणि आता तू धर्माच्या गोष्टी करतोस. पण आता वेळ गेलेली आहे. ' सरतेशेवटी कर्णाचा अंत झाला. अहंकार असला की माणसाच्या प्रगतीचे, उद्धाराचे चाक जमिनीत रुतून बसते. त्यातच त्याचा अंत होतो. वासुदेवानंद सरस्वती म्हणतात, ' मोक्ष स्वर्गात वा आकाशात वगैरे नाही. जो अहंकार नष्ट करतो, अशा व्यक्तीच्या अंतरात तो असतो.

रावणाला सुद्धा आपल्या शक्तीचा गर्व झाला होता. आपल्याला कोणीच काही करू शकत नाही. आपण वाटेल ते करू शकतो हा अहंकार त्याच्या ठायी होता. त्या अहंकारामुळेच सीतेसारख्या पतिव्रतेला उचलून आणून आपण पाप करतो आहोत याचा विवेक त्याला राहिला नाही. त्याला योग्य तो सल्ला देणाऱ्या मंदोदरी, बिभीषण आदींना त्याने तुच्छ लेखून त्यांचा उपमर्द केला. परिणामी रावणालाही नष्ट व्हावे लागले. अशी खूप उदाहरणे इतिहासात आणि पुराणात आपल्याला सापडतात. म्हणूनच ज्योतीला अहंकाराच्या वाऱ्यापासून जपायचे असते. दिव्यातील तेल संपत येईपर्यंत इतरांना प्रकाश द्यायचा असतो. अस्ताला जाताना सूर्यबिंब जसे लाल असते, तशीच ज्योतही लाल रंगाची होते. सूर्य दिवसभर प्रकाश देऊन कृतार्थ मनाने अस्ताला जातो. इतरांना त्याने जीवन दिलेले असते. आपणही असेच कृतार्थ जीवन जगावे. दिव्यासारखा प्रकाश द्यावा. समईतील जळणाऱ्या वाती मला हा प्रकाशरूपी संदेश देऊन गेल्या. त्या दिव्याच्या प्रकाशामुळे जसे देवघर उजळले होते तसेच माझे अंतरंग ही उजळून निघाले.



## आनंदी पहाट

### मनाचा विचार मनापासून मनातल्या मनात करावा

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले मन. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली मनाची शक्ती. ह्या मनाच्या शक्तीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो. आपले मन या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या मनाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या मनाची असलेली ऊब आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या जागाबरोबरचं नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले घर हे घर करून राहीलेले असते. हि घरघर प्रेत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातले धन आणि धनाढ्य मन तसेच मनातले घर आणि घरातले मन या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या मनाची यथायोग्य मशागत करणेही तितकेच जरुरीच असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### ज्ञान शुद्ध करा | ब्रह्मरूपी |||

भाव भक्ती रूप | विठ्ठल असावा ||
अंतरी वसावा | कर्मयोग ||१||
भजनी भजावा | आत्म्याचा अभंग ||
नाचे पांडुरंग | आत्मानंदी ||२||
आचार विचार | नाही जिथे मेळ ||
दांभिकता खेळ | पातकांचा ||३||
आभ्यासे लागावा | ध्यास निरंतर ||
भक्तीत अंतर | पाडु नये ||४||
अद्वैताचे ठायी | द्वैतास ना थारा ||
ज्ञान शुद्ध करा | ब्रह्मरूपी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरूपण

आधुनिक केसरी

काखमांजरी केशतोड ।वोखटें वर्ण काळफोड ।
व्याधी मूळव्याधी माहाजड ।या नांव आध्यात्मिक ॥१७॥
अंगुळवेडे गालफुगी ।कंड लागे वाउगी ।
हिरडी सुजे भरे बलंगी ।या नांव आध्यात्मिक ॥१८॥
वाउगे फोड उठती ।कां ते सुजे आंगकांती ।
वात आणी तिडका लागती ।या नांव आध्यात्मिक ॥१९॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रकृति प्रेम आश्रित रहे,
अरु प्रसन्न मन होय ।
न्युनाधिक आनन्द है, मय आनन्द
बनोय ।।५०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/५०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्यामधे प्रेम, प्रसन्नता आणि कमी
अधिक प्रेयानंद सुख आहे, ज्याचा
आधार कारण प्रकृती आहे, त्याला
आनंदमय कोश म्हणतात. आनंदमय
कोश प्राकृतिक आहे, आत्म्याचा चेतन
आनंद यात नाही.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संत एकनाथ

आधुनिक केसरी




'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी अभंगरचना, भारूड, जोगवा, गवळणी, गोंधळ यांच्या साहाय्याने जनजागृती केली. एकनाथ हे संतकवी, पंतकवी व तंतकवी होते. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले. ते 'एका जनार्दन' म्हणून स्वतःचा उल्लेख करतात, एका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे. 'एकनाथी भागवत' हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ आहे. ही एकादश स्कंदावरील टीका आहे. मुळात एकूण १३६७ श्लोक आहेत. परंतु त्यावर भाष्य म्हणून १८,८१० ओव्या संत एकनाथांनी लिहिल्या आहेत. व्यासांनी रचलेले मूळ भागवत १२ स्कंदांचे आहे. नाथांनी लिहिलेल्या भावार्थ रामायणाच्या सुमारे ४० हजार ओव्या आहेत. रुक्मिणीस्वयंवर हेही काव्य त्यांनींच लिहिले आहे. दत्ताची आरतीही (त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाण) त्यांची आरती गणपतीसमोर गायच्या आरत्यांपैकी एक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकनाथांनी ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त होते, देवीभक्त पण होते. जातिभेद दूर करण्यासाठी यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. फाल्गुन वद्य षष्ठी, शके १५२१ (२६ फेब्रुवारी इ.स. १५९९) या दिवशी संत एकनाथांनी देह ठेवला. फाल्गुन वद्य (एकनाथ षष्ठी हा) दिवस एकनाथ षष्ठी म्हणून ओळखला जातो. संत एकनाथ महाराजांच्या शिष्य शाखा महाराष्ट्र आणि बाहेरही मोठ्या प्रमाणात पसरलेली आहे. त्यापैकी काही , श्री नारायणगड (बीड), श्री भगवानगड (नगर), एकाजनार्दनी नाथपीठ (अंजनगावसुर्जी), श्री अमृतनाथस्वामी मठ (आळंदी), श्री तुकाविप्र महाराज (पंढरपूर,अंजनवती), श्रीकृष्णदयार्णव महाराज (पैठण, भारतातील सर्व मठ), श्री गोपालनाथमहाराज (त्रिपुटी, सातारा) एकनाथांची वंशपरंपरा : संत एकनाथांच्या वंशजांची अनेक घरे पैठण आणि बाहेरही आहेत. उपलब्ध माहितीनुसार नाथांच्या नंतर त्यांच्या वंशजांनी त्यांची वारकरी संप्रदायाची आणि दत्त संप्रदायाची धुरा नेटाने चालविली. कीर्तन आणि गायन याद्वारे त्यांनी त्या त्या काळी छाप पाडल्याचे अनेक कागदपत्राद्वारे लक्षात येते. त्यांच्यातील पहिले रामचंद्र (भानुदासबाबा) यांचा उल्लेख ग. ह. खरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ११ गुरूंपैकी एक असा केलेला आहे. छय्याबुवा म्हणून चौथ्या पाचव्या पिढीत एक सत्पुरुष होऊन गेले.

## प्रपंचात स्त्रीने कसे वागावे ?

आधुनिक केसरी

पतिसेवा हाच आपला धर्म ।प्रपंचाचे कर्तव्य हेच आपले सत्कर्म। अंतरी समाधान हेच आपले साधन ॥ सर्वांनी राहावे सुखी ।रामनाम नित्य घ्यावे मुखी ॥ सर्व सुखाचा लाभ ।घरबसल्या मिळतो देव ॥ कर्तव्यी असावे तत्पर ।मुखी नाम निरंतर ॥ देहाने करावी सेवा ।याहून दुजा लाभाचा नाही ठेवा ॥ परमात्म्याने जे जे दिले । ते ते त्याचे म्हणून सांभाळणे भले ॥ त्या लोभात न गुंतवावे चित्त ।हाच परमार्थ सत्य ॥ नसावे कशाचे ज्ञान ।वाटावे सदा घ्यावे रामनाम ।प्रपंची राहावे समाधान ।हेच भक्ताचे मुख्य लक्षण जाण ॥ पतिव्रता साध्वी थोर थोर। त्यांचे करावे स्मरण ।जे करील पुण्यवान ॥ न बोलावी पतीस दुरुत्तरे ।समाधान राखोनि अंतरे। जे सज्जनांस आवडेल खरे ॥ पतीपरते न मानावे दुजे दैवत ।घरात राखावे नेहमी समाधान ॥ तुमच्या पतिसार'यांची संगति ।हीच भाग्याची खरी प्राप्ति ॥ त्यांच्या आज्ञेने वागावे ।त्यांच्या सुखात आपले सुख पाहावे ॥ राम धरिता चित्ती ।प्रपंचाची काळजी त्याचे हाती ॥

प्रपंची असावे खबरदार ॥ परी लोभात न गुंतावे



अंतर ।धन संग्रही राखावे ।सर्वच खर्चून न टाकावे ।ही प्रपंचाची रीत ।सर्व जगात आहे चालत ॥ जगाची रीत लोभात असणे ।हे मात्र आपणास न आवडावे ॥ देहाने करावी पतिसेवा ।ध्यानी धरावा रामराया ।त्याचा संसार उत्तम झाला ।हाच आशीर्वाद माझा भला ॥ प्रपंचाची संगति ।काळजीची उत्पत्ति ।तेथे धरिता नामाची संगति ।काळजीविरहित आनंद देई ॥ मुलीच्या लग्नाची काळजी करू नये ।प्रयत्नाला सोडू नये। प्रयत्नाअंती परमेश्वर ।हे सज्जनांचे बोल । मनी ठसवावे खोल ॥ आरंभी ज्याने स्मरला राम ।त्यालाच प्रयत्नाअंती राम ।हा ठेवावा विश्वास ।सुखे साधावे संसारास ॥ मिष्ट भाषण वरिवरी। विष आहे अंतरी ।असल्याची संगत नसावी बरी ॥ मी तुम्हास सांगतो हित ।दृश्यांत न ठेवावे चित्त ।राम सेवेकरता प्राण ।म्हणून करणे आहे जतन ॥ मान अपमान जगतात ।ते मूळ कारण झाले घातास ॥ कोणतेही काम करीत असता । राखावी मनाची शांतता ।अगदी व्यवहारबुद्धीने कामे करावी सर्वथा ॥ आप्तइष्ट सखेसज्जन । यांचे राखावे समाधान ।परी न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने ।चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे ।कोणास विन्मुख न पाठवावे ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे ।त्यात रामाचे अधिष्ठान राखावे ॥

**७०. रामावर ठेवावा विश्वास ।सुखाने करावा संसार ॥**

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १३ फेब्रुवारी २०२४

adhunikkesari.com




## अशोक पर्व...

आधुनिक केसरी

ज्यांचा ठेवायचा आदर्श,
त्यांनीच काँग्रेस सोडली..
जाताना दुसऱ्या पक्षात,
जवळची माणसे फोडली !

कोणावर ठेवावा विश्वास ?
मुख्यमंत्री राहिलेलेही फितूर..
बाहेरच्यांना कशासाठी घेता ?
म्हणूनच भाजपातही कुरकुर !

रक्तात माझ्या काँग्रेस,
म्हणाले होते कदम..
ऐन तारुण्यात त्यांनी,
सोडला संघटनात्मक दम !

भाजपची झाली काँग्रेस,
शिव्या देणाऱ्यांचीच एन्ट्री..
वैतागलेला मतदार मारतोय,
दिवसा-ढवळ्याच कंट्री !

चला 'आदर्श' घडवूया,
सत्तापक्षात जाऊ सर्व..
कशाला हवे विरोधक ?
आणूया अशोक पर्व !!

राजेंद्र काळे, बुलडाणा
९८२२५९३८२३

# माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपात जाणार ?

## जिल्ह्यात आ. झनक समर्थकांची संभ्रमावस्था

आधुनिक केसरी न्यूज

वसंत पाटील

वाशिम : राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. तद्वतच त्यांनी आपल्या आमदारपदाचा सुद्धा राजीनामा दिला आहे. त्या अनुषंगाने चव्हाण भाजपमधे प्रवेश करणार ? या चर्चेला उधाण आले असून, जिल्ह्यातील आ. अमित झनक यांच्या समर्थकांची संभ्रमावस्था झाली आहे.

तीन पिढ्यांपासून काँगेस पक्षाशी एकनिष्ठ असलेले झनक घराणे संपुर्ण जिल्ह्यात सुपरिचित आहे. त्याच बळावर आ. अमित झनक यांनी रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर हॅटट्रिक साधत आज ते विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे त्यांचे समर्थक हे सुद्धा आपसूकच कट्टर काँग्रेस समर्थक म्हणुन गणल्या जातात. परंतू माजी मंत्री स्व. सुभाषराव झनक यांचे नांदेडच्या चव्हाण घराण्याशी असलेले घरोब्याचे सबंध, त्यातून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात स्व. सुभाषराव झनक यांना दिलेले कॅबिनेट मंत्रीपद या सर्व गोष्टी लक्षात घेता आ. अमित झनक यांचे राजकीय गॉडफादर म्हणुन चव्हाण यांच्याकडे पहिल्या जाते. आज त्याच अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा व आमदारकीचा राजीनामा दिला असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली आहे. त्यांचा भाजपमधे प्रवेश होणार ? अशी अफवा तालुकाभरात पसरली असली तरी अधिकृत माहिती अद्याप पर्यंत हाती आलेली नाही. मात्र तालुक्यात उलट सुलट चर्चाचे फड रंगत असून आ. झनक यांच्या कट्टर समर्थकांची गोंधळलेली संभ्रमावस्था पहावयास मिळत आहे. परिणामी वाशिम जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



### आ. अमित झनक काँग्रेस सोबत ठाम



नुकतीच आ. अमित झनक यांची एक व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, त्यात त्यांनी आपल्या समर्थकांना संबोधित केले आहे की, कुठल्याही अफवावर विश्वास ठेवु नका..! माझ्या विषयी ज्या काही उलट सुलट बातम्या येत आहेत त्या सर्व चुकीच्या आहेत. माझ्या घराण्याचे गेल्या तीन पिढ्यांपासून काँगेस सोबत निष्ठेचे व विश्वासाचे सबंध आहेत. पक्षाने आम्हाला खुप काही दिलेले आहे. तत्वाशी आणि पक्षाशी एकनिष्ठ हा आमच्या घराण्याचा वारसा आहे. त्यामुळे मी, काँग्रेस पक्षासोबत ठाम असल्याचे त्यांनी सदर ध्वनीफितीतून स्पष्ट केले आहे.

**पक्षनिष्ठा ढळू नये समर्थकांचे मत** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा हे त्यांचे वैक्तिक राजकारण असू शकते. मात्र पक्षाशी आणि तत्वाशी एकनिष्ठ असलेल्या झनक घराण्याचा वारसा विद्यमान आमदार अमित झनक यांनी जपून पक्षनिष्ठा ढळू देऊ नये. अशा प्रतिक्रिया त्यांच्या अनेक कट्टर समर्थकांनी दैनिक आधुनिक केसरीशी बोलतांना व्यक्त केल्या आहेत. या बाबत आ. झनक यांच्याशी संपर्क साधला असता, ते म्हणाले की, अजून काहीही निश्चित झालेले नाही. हे राजकारण आहे. त्यावर लगेचच व्यक्त होणे उचित ठरणार नाही.

**दिल्लीतील पक्षश्रेष्ठींशी विश्वासाचे घनिष्ठ संबंध** : आ. अमित झनक यांचे काँग्रेसचे विद्यमान प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या सोबत चांगले संबंध तर आहेतच, पण दिल्लीतील पक्षश्रेष्ठींशी सुद्धा विश्वासाचे घनिष्ठ संबंध आहेत. राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेत सक्रीय सहभाग घेतला होता. पक्षाशी असलेली निष्ठा व युवा आमदार म्हणुन त्यांनी गाजविलेली कारकीर्द पाहता त्यांच्यावर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदाची धुरा सुद्धा सोपविण्यात आली आहे. झनक घराणे आणि काँग्रेस हे एक अतूट नाते असल्याचे संपुर्ण जिल्हावासियांच्या मनात ठाम आहे. त्यामुळे आ. अमित झनक काय भूमिका घेणार ? हा सध्यस्थितीत कुतूहलाचा विषय ठरत आहे.

# सकल धनगर समाजाचे पारंपरिक वाद्यांसह एकदिवसीय धरणे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** १२ फेब्रुवारी रोजी सोमवार जळगाव जामोद येथे सकल धनगर समाजाचे पारंपरिक वाद्य सह एकदिवसीय धरणे आंदोलन केले. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गेली 75 वर्षापासून प्रलंबित असून हा धनगर समाजावर झालेला अन्याय आहे धनगर समाजाचा घटनात्मक आरक्षणाचा अधिकार नाकारून 75 वर्षापासून राज्यकर्त्यांनी जो अन्याय केला. तो दूर करून समाजाला तात्काळ एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करून एसटी सर्टिफिकेटची मागणी राज्यात जोर धरत आहे. बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २९ जानेवारी पासून उपोषणाला बसलेले श्री नंदु भाऊ लंवगे यांच्या समर्थनार्थ जळगाव जामोद तहसील कार्यालय समोर सकल धनगर समाज जळगाव जामोद यांच्या वतीने धनगरी वाद्य सह एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले असून येत्या दोन दिवसांत योग्य तो निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला



असून सदर आंदोलनामधे जळगाव जामोद तालुक्यातील गिता सोनोने, अपेक्षा पुंडे, पार्वतीबाई सुसिर, दिलीप भिवटे, सुनील भिवटे, शिवदास सोनोने, पांडुरंग घोंगे, हरिभाऊ वाघमारे, गजानन सुषिर, भाऊराव वानखेडे, प्रमोद तितरे, प्रमोद सपकाळ, भगवान मुंडे, अमित भिवटे, राहुल वाघमारे यांचे सह सकल धनगर समाज बांधव माता भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मोप येथे स्वाभिमानीची आज कर्जमुक्ती सभा

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटने कडून संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली 'स्वाभिमानीचा नारा कर्जमुक्त सातबारा' अभियान राबवून सुरू करण्यात आलं असून आज दिनाक 13 फेब्रुवारी रोजी सायंकाळी मोप येथे सायंकाळी ६ वाजता शेतकरी नेते गजानन अहमदाबादकर व युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या उपस्थितीत कर्जमुक्ती सभा होणार आहे. या अभियानाअंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना किमान दोन लाख शेतकऱ्यांकडून कर्ज मुक्तीचे अर्ज देण्यात येणार आहेत. चार वर्षांपासून अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ अश्या विविध संकटामुळे शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहेत. शिवाय महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या नावाखाली सरकारने सोयाबीन, तूर, कांदा, कापूस, हरभरा,गहू व सर्वच पिकाचे भाव पाडले आहेत. एकीकडे सरकार निर्यातबंदी लावते तर दुरीकडे आयात वाढवली जाते. त्यामुळे शेतकरी रसातळाला गेले आहेत.

# तरुणांनी खरा इतिहास समजावून घ्यावा : पानिपतकार विश्वास पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** अर्धवट, चुकीच्या किंवा अफवायुक्त ऐतिहासिक माहितीवर विसंबून राहिल्याने तीच माहिती खरी मानल्याने बऱ्याच वेळा समाजामध्ये गोंधळ उडतो. कोणाला आदर्श मानावे आणि कोणाकडून प्रेरणा घ्यावी याबद्दल तरुणांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. यामुळे अनेक वेळा समाजात महापुरुषांबद्दल विनाकारण गैरसमज निर्माण होऊन त्यांच्याबद्दल समाजात कलुषित दृष्टिकोन निर्माण होण्याचा व जातीय - धर्मीय तेढ निर्माण होण्याचा धोका संभवतो. हे टाळण्यासाठी तरुण पिढीने खरा इतिहास वाचला पाहिजे, तो वस्तुनिष्ठपणे समजावून घेतला पाहिजे, असे आवाहन प्रसिद्ध कादंबरीकार, पानिपतकार आणि सेवानिवृत्त सनदी अधिकारी विश्वास पाटील यांनी केले. महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांच्या मातोश्री सुगंधाबाई



त्र्यंबक चांदगुडे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, राजमाता जिजाऊ, शहाजीराजे भोसले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य अतुलनीय आहे. गौरवशाली व आदर्श इतिहास त्यांनी घडविला आहे याचे अनेक दाखले आहेत. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध केला, तेव्हा शहाजीराजे भोसले हे बादशहाच्या दरबारात होते. मात्र त्यांच्या अंगालाही कुणी हात लावण्याची हिंमत केली नाही, कारण त्यांनी त्यांची चाकरी अतिशय इमाने इतबारे केली होती. त्यातून शत्रूच्या मनातही त्यांच्याबद्दल एक आदरयुक्त, नैतिक धाक निर्माण झालेला होता. हा सर्व ज्वलंत, नैतिक, चारित्र्यसंपन्न व गौरवशाली इतिहास तरुण पिढीने जाणीवपूर्वक वाचला पाहिजे व तो समजावून घेतला पाहिजे. म्हणजे त्यांच्या जीवनात जर निराशा असेल तर ती झटक्यात दूर होईल, असे प्रतिपादन विश्वास पाटील यांनी केले. मातोश्रींच्या प्रथम स्मृतिदिनी परंपरेने चालत आलेल्या सर्व धार्मिक कर्मकांडांना फाटा देत चांदगुडे कुटुंबियांनी यावेळी विविध सामाजिक संस्थांना मान्यवरांच्या हस्ते आर्थिक मदत देऊन त्यांच्या समाजकार्याचा गौरव केला. यामध्ये वात्सल्य वृद्धाश्रम, मुकबधीर विद्यालय, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व मायभूमी सोशल फाउंडेशन यांचा समावेश होता. यावेळी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थीनींचा रोख पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक कुप्रथांना तिलांजली देण्यात आली. त्यात कार्यक्रमात महिलांना जाणीवपूर्वक उजव्या बाजुला बसविणे, जेवणाचा मान प्रथम महिलांना देणे, मंचावर केवळ महिलांना बसविणे आदी बाबींतुन महिलांचा सन्मान जपण्यात आला. रक्तदान घेण्यात आले. यामुळे परीसरात चांदगुडे कुटुंबाचे कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड रंजना गवांदे यांनी केले. गौरवार्थी सामाजिक संस्थांचा परिचय किरण चांदगुडे यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सोमनाथ चांदगुडे यांनी केले.

**पुरोगामी चांदगुडे कुटुंबीय** : एक वर्षांपूर्वी जेव्हा चांदगुडे यांच्या आईचे निधन झाले त्यावेळीही त्यांचे मरणोत्तर देहदान केले होते. दशक्रिया विधी किंवा कुठलेही धार्मिक अवडंबर न करता अवयवदान यावर व्याख्यान, भव्य रक्तदान, सामाजिक संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली. आपल्या विधवा आईला कपाळी कुंकू, जोडवे घालत विधवा प्रथेला तिलांजली दिली. आपल्या कन्येला पहिल्या मासिक पाळीचा त्यांनी मोठा समारंभ केला होता.

## फडणवीसांचे सूचक वक्तव्य

आधुनिक केसरी

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सोमवारी काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. सकाळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची अशोक चव्हाण यांनी भेट घेतली होती. त्यानंतर अशोक चव्हाण हे राजीनामा देणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर अशोक चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. मागील अनेक दिवसांपासून अशोक चव्हाण हे भाजपात जाणार, अशी चर्चा होत होती. मात्र अशोक चव्हाण यांनी आपण काँग्रेसमध्येच राहणार असल्याचे वारंवार स्पष्ट केले होते. मात्र, आज अशोक चव्हाण यांनी काँग्रेसचा हात सोडला आहे. भाजपकडून अशोक चव्हाण यांना राज्यसभेची उमेदवारी दिली जाण्याची शक्यता असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. काँग्रेसमधील अनेक चांगले नेते हे भाजपच्या संपर्कात आहेत. जनतेशी कनेक्ट असलेल्या नेत्यांची काँग्रेसमध्ये गुदमरल्यासारखी अवस्था आहे त्यामुळे आगामी काळात काँग्रेसमधील मोठे नेते भाजपमधील येतील असा विश्वास असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. आमच्या संपर्कात कोण कोण आहे याबाबत लवकरच अनेक खुलासे होतील त्यामुळे आगे-आगे देखो होता है क्या असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी सूचक इशारा दिला आहे. दरम्यान, प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी चव्हाण यांना विचारले की, असे काय घडले की, तुम्ही राजीनामा देण्याचा निर्णय घेतला, पक्ष सोडण्याचा निर्णय कधी पक्का केला? यावर अशोक चव्हाण म्हणाले, प्रत्येक गोष्टीला काही कारण असलेच पाहिजे असे काही नाही. तसेच प्रत्येक कारण सर्वांना सांगितलेच पाहिजे असेही काही नाही. सगळ्याच गोष्टी जाहीर केल्या जात नाहीत. मी कधीही माझ्या पक्षांतर्गत बाबी लोकांसमोर, माध्यमांसमोर मांडल्या नाहीत. तसेच पक्षात काही उणीदुणी असतील तर मी ती कधीही चव्हाट्यावर मांडली नाहीत. पक्ष सोडण्याच्या निर्णयाबाबत अशोक चव्हाण म्हणाले, मी सुरुवातीपासून काँग्रेसमध्ये आहे. आता मला वाटते की मी अन्य पर्याय पाहिले पाहिजेत म्हणून राजीनामा दिला आहे. काँग्रेस सोडणे हा माझा वैयक्तिक निर्णय आहे. तुम्ही भाजपात जाणार का? भाजपा तुम्हाला राज्यसभेवर पाठवणार असल्याची चर्चेत किती तथ्य आहे? यावर अशोक चव्हाण म्हणाले, मला भाजपाची कार्यप्रणाली माहिती नाही. मी अद्याप भाजपात जाण्याचा किंवा इतर कुठल्याही पक्षात जाण्याचा निर्णय घेतला नाही. येत्या एक ते दोन दिवसांत मी माझी पुढची राजकीय दिशा जाहीर करेन.

## पाकिस्तानमध्ये राजकीय संकट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पाकिस्तानातील राजकीय संकट सध्यातरी दूर होताना दिसत नाही. कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्याने आणि मतदानाच्या दुस-या दिवशीही सर्व जागांचे निकाल जाहीर न झाल्याने ही भीती आणखी वाढली आहे. पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, जवळपास २१ जागांचे निकाल अद्याप प्रतीक्षेत आहेत. पाकिस्तानी वृत्तवाहिनी जिओ न्यूजनुसार, नॅशनल असेंब्लीच्या २६५ जागांपैकी २४४ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. ज्यामध्ये इम्रान खान यांच्या पक्ष पीटीआयने पाठिंबा दिलेल्या उमेदवारांनी ९६ जागा जिंकल्या आहेत, नवाझ शरीफ यांच्या पक्ष पीएमएल-एनने ७०जागा जिंकल्या आहेत.**




पाकिस्तान पीपल्स पार्टीने ५३ जागा जिंकल्या आहेत. तर MQM-P ला १५ जागा मिळाल्या आहेत.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी सरकार स्थापनेसाठी प्रयत्न तीव्र केले आहेत. शरीफ यांनी शुक्रवारी त्यांच्या कार्यालयाबाहेर जमलेल्या लोकांना संबोधित केले. "निवडणुकीनंतर, पाकिस्तान मुस्लिम लीग आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे आणि या देशाला चक्रीवादळातून बाहेर काढणे हे आपले कर्तव्य आहे," असे त्यांनी लाहोरच्या पूर्वेकडील शहरातील त्यांच्या घराबाहेर जमलेल्या समर्थकांच्या गर्दीला सांगितले. "ज्याला जनादेश मिळाला आहे, मग तो अपक्ष असो वा पक्ष, आम्ही त्यांना दिलेल्या जनादेशाचा आदर करतो," ते म्हणाले. "आम्ही त्यांना आमच्यासोबत बसण्यासाठी आणि या जखमी राष्ट्राला पुन्हा त्याच्या पायावर उभे राहण्यास मदत करण्यासाठी आमंत्रित करतो."

द गार्डियनने वृत्त दिले की विश्लेषक आणि उमेदवारांनी गुरुवारच्या निवडणुकीच्या अखंडतेवर मोठ्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि तीन वेळा माजी पंतप्रधान नवाझ शरीफ आणि त्यांची पाकिस्तान मुस्लीम लीग (पीएमएल-एन) सत्तेवर येतील अशी चिंता व्यक्त केली. हेराफेरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पाकिस्तानच्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यानंतर सरकार स्थापनेसाठी हेराफेरी सुरू झाली आहे. नवाझ शरीफ यांच्या पीएमएल-एनच्या प्रवक्त्या मरियम औरंगजेब यांनी म्हटले आहे की पीपल्स पार्टीसोबत युतीचे सरकार स्थापन करण्यासाठी चर्चा झाली आहे, अंतिम निर्णय प्रलंबित आहे. त्यांच्याशिवाय पंजाब आणि बलुचिस्तान प्रांतात आणि केंद्रात सरकार स्थापन होऊ शकत नाही, असे पीपीपीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, पाकिस्तान संसदेत सर्वाधिक १०२ जागांवर पीटीआय-समर्थित अपक्षांच्या विजयामुळे उत्साहित, इम्रान खान यांच्या पक्ष पीटीआयचे अध्यक्ष गौहर अली खान यांनी म्हटले आहे की राष्ट्रपती त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करतील. निवडणुकीतील हेराफेरीबाबत पीटीआय समर्थक रविवारी निवडक जागांवर आंदोलन करणार आहेत. त्याचवेळी, राजकारण्यांनी स्वार्थाच्या वर उठून जनतेची सेवा करण्यासाठी समन्वय साधला पाहिजे, असे पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी म्हटले आहे. दरम्यान, काळजीवाहू पंतप्रधान अन्वारुल हक काकर यांनी म्हटले आहे की, देशात आघाडीचे सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे. सरकार स्थापनेच्या शर्यतीत नवाज पुढे आहेत. सध्याच्या परिस्थितीत मुस्लीम लीग-नवाज सरकार स्थापन करण्यासाठी सर्वात मजबूत स्थितीत असल्याचे दिसते. तांत्रिकदृष्ट्या ७३ जागांसह सर्वात मोठा पक्ष आहे. तसेच, निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार, सर्व निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर, अपक्षांनी नवा गट स्थापन करावा की कोणत्याही एका पक्षाला पाठिंबा द्यावा, याबाबत तीन दिवसांत त्यांची भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे.

पक्षांसाठी प्रवास कठीण होईल.विश्लेषकांचे म्हणणे आहे की तांत्रिकदृष्ट्या पीटीआयच्या पाठिंब्याने विजयी झालेले अपक्ष एक गट म्हणून सरकार स्थापन करण्याचा दावा करू शकतात, परंतु त्यांच्यासाठी स्वतःला एकसंध ठेवण्याचे आव्हान असेल. नॅशनल असेंब्लीच्या २६६ जागांसाठी थेट निवडणुका घेतल्या जातात, परंतु एकूण सदस्य संख्या ३३६आहे. महिला आणि आदिवासींसाठी अनुक्रमे ६० आणि १० जागा राखीव आहेत. निवडणुकीत जिंकलेल्या जागांच्या आधारे या राखीव जागा राष्ट्रीय पक्षांना दिल्या जातात. पीटीआयसाठी आव्हान हे आहे की अपक्ष कोणत्याही पक्षाच्या व्यासपीठावर विजयी झाले नाहीत, त्यामुळे त्यांना या राखीव जागांवर कोणताही वाटा मिळणार नाही. त्यामुळे नॅशनल असेंब्लीतही बहुमत मिळणे कठीण होणार आहे. सरकार स्थापन करण्यासाठी १३४ जागांवर बहुमत असणे आवश्यक आहे. पाकिस्तानमध्ये प्रामुख्याने ३ पक्षांमध्ये स्पर्धा आहे. यामध्ये पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाज (पीएमएल-एन), पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) यांचा समावेश आहे.पाकिस्तानच्या राष्ट्रीय निवडणुकीत तेथील लष्कराचा हस्तक्षेप असतो. त्यामुळे लष्कराने ज्या नेत्याला पाठिंबा दिला, तोच नेता या निवडणुकीत विजयी होतो, असे म्हटले जाते. यावेळी लष्कराने आपली ताकद नवाझ शरीफ यांच्या पाठीमागे उभी केली होती. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत नवाझ शरीफ हेच बाजी मारतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. प्रत्यक्ष निकाल मात्र काहीसा वेगळा लागला आहे. येथे इम्रान खान यांचा पाठिंबा लाभेलेले अपक्ष उमेदवार अनेक जागांवरून विजयी झाले आहेत. तर नवाझ शरीफ यांचा पक्ष विजयी उमेदवारांच्या तुलनेत थेट दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे.

## नवोदय



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

**(मागील अंकावरून)** तेवढ्यात विराट चे पप्पा त्यांच्याजवळ गेले. त्यांना म्हणाले की,' शाळा सोडल्या च्या दाखल्याबाबत काय झाले?' पुन्हा ते म्हणाले, 'अहो तुम्हाला सांगितले ना देता येत नाही म्हणून, आम्हाला पुण्याला विचारावा लागेल. त्या कार्यालयाला चौकशी करण्यासाठी आठ दहा दिवस लागतील. तुम्ही उद्या या.' विराटच्या पप्पाचे डोके भनकले.ते किती खोटं बोलतात. बनवाबनवी करतात हे लक्षात यायला लागले. तसे विराट चे पप्पाही परिवर्तन चळवळीत काम करत असत. अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध लढत होते.म्हणून विराटचे पप्पा त्यांना म्हणाले, तुम्ही सकाळी एका पालकाला सगळी कागदपत्रे दिली आहेत. तुम्ही मला का अडवत आहेत. तुम्ही असा अडविण्याचा प्रयत्न केला तर मी आत्ताची आत्ता कलेक्टर साहेबांकडे जाईल. तुमची वरिष्ठाकडे तक्रार करीन. अशी थोडी बोला बोली झाली. नंतर त्यांनी दुपारी चार वाजता यायचे सांगितले. विराटनी व इतरांनी कोणीही जेवण केले नव्हते. तसेच तेथे थांबले. चार वाजता कार्यालयातील अधीक्षक आल्यानंतर त्याने नो ड्युज करण्याबाबतचा अर्ज दिला व त्यावर सगळ्यांच्या सह्या आणा म्हणून सांगितले. विराटच्या पप्पांनी नो ड्युजचा अर्ज घेतला व भरला. उपस्थित असलेल्या शिक्षकांच्या सह्या घेतल्या. तो कार्यालयीन अधीक्षकाकडे दिला. कार्यालयीन अधीक्षकाने दुसऱ्या क्लार्क कडे तो अर्ज दिला. ते म्हणाले की आम्ही तुम्हाला ड्रेस, चादर,बेडशीट व इतर काही वस्तू दिले आहेत त्या आम्ही परत घेत नाहीत त्यामुळे तुम्हाला एकोणिसशे रुपये भरावे लागतील असे सांगितले. मी खिशातून पैसे काढले व त्यांच्याकडे द्यायला लागलो तेवढ्यात ते म्हणाले की सोमवारीच द्या. नंतर कार्यालयीन अधीक्षकाने सांगितले की, आठ दहा दिवसांनी टी.सी. देण्यात येईल. खरंतर हे छळवणूक विराटच्या पप्पांना सहन होत नव्हती. ते शिक्षण क्षेत्रातील सर्वजण किती लबाड बोलत होते. हे जाणवत होते. शेवटी कार्यालयीन अधीक्षक विराटच्या पप्पाकडे आला व म्हणाला, 'सोमवारी या मी तुम्हाला फोन करतो. विराटचे पप्पा घरी परत आले. विराट येताना गाडीत बसल्यानंतर म्हणत होता,'पप्पा बरं झालं. माझं नाव नवोदय विद्यालयातून काढून घेतलं. तिथं काही चांगलं नव्हतं. शिकवणी ही चांगली नव्हती. शिक्षकही लक्ष देत नाहीत.' शेवटी विराट त्याच्या जुन्या शाळेत जाऊ लागला. छोटा भाऊ जय विराटच्या येण्याने मात्र खुश दिसत होता. ठरल्याप्रमाणे विराट चे पप्पा सोमवारी कार्यालयीन अधीक्षकाच्या फोनची वाट पाहत पण त्यांचा काही फोन आला नाही. विराटच्या पप्पांनीच दुपारी एक वाजता कार्यालयीन अधीक्षकाला फोन केला आणि टी.सी बाबत विचारणा त्यावेळी त्यांनी सांगितले की या टि.सी मिळून जाईल. पुन्हा एकदा दरम्यान विराट व सगळेजण टि.सी. आणण्यासाठी निघाले. तिथे पोहोचले व कार्यालयीन अधीक्षकांना भेटले. पुन्हा परत त्यांनी विराटच्या पप्पांना नो ड्यूज परत दिले व पुन्हा उरलेल्या शिक्षकांच्या सह्या घेऊन या म्हणून सांगितले. विराटच्या पप्पांनी पुन्हा त्या सह्या आणल्या. कार्यालयीन अधीक्षकाकडे ते नोटीस कार्यालयीन अधीक्षक म्हणाले की आता ते पैसे भरून टाका. पुन्हा त्या दुसऱ्या क्लार्क कडे गेलो व एकोणीसशे पन्नास रूपये दिले. ते म्हणाले ,तेविसशे रूपये भरायचे आहेत. मी त्यांना म्हणालो, त्यादिवशी तुम्ही एवढेच सांगितले होते. ते म्हणाले, हो, पण काही वस्तू माझ्या लक्षात नव्हतं म्हणून वाढले आहेत. विराटच्या पप्पांनी ते सगळे पैसे देऊन टाकले. तेवढ्यात जेवणाची वेळ झाली व सगळे निघून गेले. विराट व विराट चे पप्पा सगळे तिथेच थांबले. **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फुलंब्री येथे युवा मोर्चाच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे

**फुलंब्री :** येथे युवा मोर्चाच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ,युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष साजन बागल, तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव, जितेंद्र जयस्वाल युवा तालुकाध्यक्ष गणेश तांबे, युवा शहराध्यक्ष वाल्मिक जाधव, माजी उपनगराध्यक्ष गजानन नागरे, बाळू तांदळे, कृष्णा सोटम, बाबासाहेब शिनगारे, सुमित प्रधान, योगेश मिसाळ, राजू उबाळे गणेश तांदळे सुनिल जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने नमो चषकाचे देशभर आयोजन करण्यात आले असून भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने विविध खेळाचे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने फुलंब्री येथे भारतीय जनता मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश तांबे, युवा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, गजानन नागरे, यांच्यावतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत 400 मुलांनी ऑनलाईन नोंदणी करण्यात आली होती. तसेच स्पर्धेमध्ये मुलींसाठी ३ किलोमीटर धावणे व मुलांसाठी ५ किलोमीटर धावणे अशा पद्धतीचे नियोजन करण्यात आले होते. आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरवात करण्यात आली त्यात मुलींच्या गटात शिवानी जाधव वानेगाव, कोमल चव्हाण नायगाव, अतिथी ठाले तळेगाव, शिवानी कचोले जवखेडा, नंदा तिडके असडी यांनी बाजी मारली तर मुलांच्या गटात प्रितेश बाळू सोनवणे जळगाव, राजू संजू खाडवे गणेशपूर, राजू बाबासाहेब नजर किनगाव यांनी बाजी मारली. यावेळी चंद्रकांत राऊत, अजय नांगरे, योगेश पेटारे, भूषण काळे, कुलदीप सुरभैये, दिलीप मस्के, मयूर कोलते, आकाश गोरवणे, प्रेम जाधव, यश गायकवाड, यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या वेळी भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने बक्षीस पात्र विध्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फुलंब्री पोलीस निरीक्षक संजय सहाने व उपनिरीक्षक श्रीनिवास धुळे यांनी वाहतूक सुरळीत करण्यामध्ये विशेष सहकार्य केले.

# नियमांचे पालन करत शिवजयंती साजरा करा

## सपोनि प्रफुल्ल साबळे यांची सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व फर्दापूर, सावळदबारा



परिसरात, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्यासाठी परिसरात गावात ठिकठिकाणी मोठी तयारी सुरु आहे. येत्या 19 फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंती उत्सव साजरा होणार आहे. हा उत्सव सुरळीत पार पडावा यासाठी फर्दापूर पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यायचे ठरवले आहे. शिवजयंती उत्सव साजरा करताना कायदा सुव्यवस्था राखत साजरा करावा, तसेच सामाजिक व प्रबोधनात्मक देखावे सादर करावेत, अशा सूचना सावळदबारा येथे चक्रधर स्वामी मंदीरावर पोलिस सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी मंडळांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना केल्या आहेत. सामाजिक देखावे, प्रबोधन, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम घेत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तरुण पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा, सामाजिक दृष्टीकोनातून काम करावे अशा सूचना त्यांनी केल्या. यंदा सामाजिक प्रबोधन करणाऱ्या मंडळांचा सन्मान देखील आमच्या पोलिस स्टेशनच्या वतीने करण्यात येईल, अशी घोषणाही केली.

उत्सवाप्रसंगी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, शासनाच्या आदेशाप्रमाणे डिजेला कुठल्याही प्रकारची परवानगी नसणार आहे, सावळदबारा परिसरात व फर्दापूर सर्व मंडळांनी परवानगी घेऊन जयंती साजरी करावी, वेळेचे पालन करावे, फलक बॅनरची परवानगी घेणे आवश्यक असणार आहे. त्यावरील मजकुरांची पोलिस पाहणी केल्यानंतर परवानगी देण्यात येईल, कुठल्याही देखावा सादर करतांना पोलिस त्यांची पाहणी करून परवानगी देणार आहेत. पोलिस प्रशासन अहोरात्र आपल्या मदतीला असून कुठल्याही समस्या असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन सपोनि प्रफुल्ल साबळे व पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांनी केले आहे.याप्रसंगी सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे,प्रा जीवन कोलते पाटील, प्रा. मदन डोखळे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, मोहन सुरडकर, गणेश खैरे, पो.पा.विलास कुल्ले,प्रा योगेश चोपडे, मंदीराचे पुजारी, शिव जयंतीचे मंडळाचे पदाधिकारी, पत्रकार बंन्धू, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कापूस उत्पादकांना न्याय देण्यासाठी जाचक अटी शिथिल कराव्यात : वडेट्टीवार

**मुंबई :** कापूस उत्पादकांना न्याय देण्यासाठी शासनाने जाचक अटी



शिथिल करून कापूस पणन महासंघाने मागितलेली परवानगी व कापूस खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अर्थसहाय्यासाठी हमी घेणे आवश्यक आहे. कोरोना महामारीच्या विपरीत परिस्थितीत महाविकास आघाडी सरकारने कापूस खरेदी केला. पण सद्यःस्थितीत महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना न्याय देण्यात अपयशी ठरले असून कापूस उत्पादकांना न्याय देण्याच्या दृष्टीने सरकारने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, कापूस



उत्पादक शेतकऱ्यांकडे २५० ते ३०० लाख क्विंटल कापूस विक्रीसाठी उपलब्ध आहे. तरीही फक्त ११ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली आहे. यावर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे कापसामध्ये ओलावा निर्माण होऊन त्याची प्रतवारी कमी झाली आहे. सी.सी. आय. च्या जाचक अटी व मापदंडामुळे कापूस खरेदी केला जात नाही. सद्यःस्थितीत कापूस उत्पादकांच्या घरात मोठ्या प्रमाणात विक्री करीता कापूस पडून आहे. राज्यात १०९ खरेदी केंद्र प्रस्तावित असून त्यापैकी ९० केंद्रांना खरेदीची परवानगी देण्यात आली आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतक-यांना हमीभावापेक्षा कमी दरात नाईलाजाने कापूस विकावा लागत आहे. आम्ही कापूस खरेदी करु, शेतकऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी भावाने कापूस विकू नये, असे आवाहन उपमुख्यत्र्यांनी केले आहे. त्यामुळे कापूस उत्पादक संभ्रमात आहे. वडेट्टीवार म्हणाले की,कापूस पणन महासंघाचे मागील खरेदीच्या व्यवसायामधील रु. १०१.७२ कोटी केंद्र शासनाकडून येणे आहे. हा निधी प्राप्त झाल्यानंतरच पणन महासंघाकडून कापूस खरेदी प्रक्रिया सुरु होऊ शकते. त्यामुळे राज्य शासनाने हा निधी कापूस पणन महासंघाला तात्काळ उपलब्ध करुन दिला पाहिजे, तरच कापूस खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल.



# संत एकनाथ कारखान्यात सचिन घायाळचे वर्चस्व

## 6 संचालक बिनविरोध, तर 15 संचालक मोठ्या मतधिक्याने विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या १५ संचालकाच्या झालेल्या निवडणूकीत सचिन घायाळ पॅनलचे १५ संचालक मोठ्या मताधिक्याने विजय झाले असुन 6 उमेदवाराची बिनविरोध निवड झाल्याने संत एकनाथ सहकारी कारखान्यावर सचिन घायाळ यांनी बाजी मारली .माजी आमदार संजय वाघचौरे यांच्या प्रतिस्पर्धी पँनलचे सर्वच उमेदवार पराभव झाला आहे. कधी काळी संत एकनाथ सहकारी साखर कारखाना ताब्यात घेण्यासाठी पैठण तालुक्यातील मात्तबर पुढारी आप आपली राजकीय ताकद पणाला लावुन कारखाना निवडणूकीत वर्चस्व दाखवायचे परंतु यंदाच्या साखर कारखाना निवडणूकीत सचिन घायाळ ने नवीन चेहरे समोर करत सर्वसाधारण नागरिकांना संधी देत प्रस्तापित राजकारनी मंडळीला घायाळ केले. शहरातुन भव्य मिरवणूक काढुन सर्व संचालक मंडळाने संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात दर्शन घेतले.

निवडुन आलेले संचालक : पँनल प्रमुख, सचिन घायाळ, तुषार शिसोदे, अक्षय शिसोदे , दत्तू मामा आम्ले, हरिभाऊ मापारी, प्रल्हाद औटे, एकनाथ नवले, विक्रम घायाळ, आबासाहेब मोरे, दत्ता वाकडे, भाऊसाहेब पिसे, सौ .ताराबाई घायाळ, सौ . अनुराधा तुपकरी, सौ .उषाताई थोरात, दिगंबर गोरडे, कचरू बोबडे, रमेश झीने, कैलास तूपकरी, शिवाजी जाधव, बाबासाहेब खराद, .

# कृषी विभाग पुरस्काराच्या रकमेत चौपट वाढ; शिसोदिया यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सरकारतर्फे शेतकऱ्यांचा योग्य मान सन्मान केला जाणार आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत शेती क्षेत्राशी संबंधित उल्लेखनीय कार्याकरिता देण्यात येणाऱ्या विविध प्रस्करांच्या रकमेत चौपट वाढ करण्यात आली आहे अशी माहिती सोयगाव कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी दिली आहे. शेती व शेतीपूरक क्षेत्रामध्ये अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यास अथवा संस्थेस कृषी विभागामार्फत दरवर्षी विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी वेळोवेळी कृषी पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्याची घोषणा ठिकठिकाणी केली होती. या घोषणेची पूर्तता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने आज करण्यात आली आहे. पुरस्कारांची संख्या आणि पुरस्कार विजेत्यांचा भत्ता सुद्धा वाढविण्यात आला आहे. विविध कृषी पुरस्कारांची संख्या, पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराची पूर्वीची रक्कम ७५००० होती ती वाढवून ३ लाख रुपये करण्यात आली आहे. वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार ८ जणांना देण्यात येणार आहे. जिजामाता कृषी भूषण पुरस्कार हा ५ जणांना, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार ८ जणांना, उद्यान पंडित पुरस्कार ८ जणांना देण्यात येणार आहे. या चारही पुरस्कारांची रक्कम प्रत्येकी ५० हजार वरून २ लाख रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. तर, वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार तीघांना दिला दाणार आहे. युवा शेतकरी पुरस्कार ८ जणांना देण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी पूर्वी ३० हजार रुपयांची रक्कम देण्यात येत होती ती आता १ लाख २० हजार रुपये करण्यात आली आहे. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सर्वसाधारण गटात ३४ शेतकऱ्यांना सन्मानित केले जाणार आहे. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार आदिवासी गटात सहा जणांना पुरस्कार दिला जाणार आहे. दोन्ही पुरस्कारांच्या रक्कमेत ११ हजार वरून ४४ हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार १० जणांना तर उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञ पुरस्कार ४ जणांना देण्यात येईल. पुरस्कार विजेत्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता दैनिक प्रवास भत्त्यात वाढ करण्यात आली असून प्रत्येक विजेत्याला १५ हजार रुपयेभत्ता देण्यात येईल. याबाबतचा शासन निर्णय बैठकीत निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी बोलताना सांगितले.

# ग्राहक पंचायतच्या तालुकाध्यक्षपदी मंचक जगताप, उपाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार

आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर

**जिंतूर :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतची बैठक शासकीय विश्रामगृह येथे 8 फेब्रुवारी रोजी घेण्यात आली त्या बैठकीत नूतन कार्यकारिणीची निवड डॉक्टर विलास मोरे प्रांत अध्यक्ष देवगिरी यांच्या वतीने बिनविरोध जाहीर करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलाबराव शिंदे, प्रमुख पाहुणे डॉ. विलास मोरे, शंकरराव बचाटे, गंगाधरराव कान्हेकर, नागोराव देशमुख, सुदाम कुटे, आशाताई खिल्लारे, दिलीप देवकर, महेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

डॉ.विलास मोरे यांनी मार्गदर्शन करताना प्रत्येक नागरिक हा ग्राहक आहे. जन्मल्यापासून ते मरेपर्यंत आपल्या गरजा भागविण्यासाठी आपण दररोज घेत असलेल्या वस्तू किंवा सेवा ग्राहक रूपानेच खरेदी करत असतो. आपली फसवणूक झाल्यावर आपण अखिल भारतीय ग्राहक पंचायत मार्फत मार्गदर्शन घेऊन याप्रकरणी न्याय मागू शकतो. सदरील कार्यकारणी खालील प्रमाणे आहे. मार्गदर्शक= चंद्रकांत गवळी, अध्यक्ष= मंचक देशमुख, उपाध्यक्ष= सचिन रायपत्रीवार, उपाध्यक्ष= काशिनाथ घुगे, सचिव= ज्ञानेश्वर रोकडे सहसचिव= माणिक शिंदे, सहसचिव= प्राचार्य राहुल वाहुळे, कोषाध्यक्ष= शेख गफार अफजल शेख, सहकोषाध्यक्ष= किसनराव खाडे, संघटक =बालाजी शिंदे, सहसंघटक= प्रल्हाद टाकरस, सदस्य= मधुकरराव गोरे, विष्णू चव्हाण, माणिक शिंदे, महिला सदस्य= सुनिता कांबळे ,अर्चना बांडे बामणी शाखा अध्यक्ष =शंकरराव जाधव यांची निवड करण्यात आली आहे. वरील सर्व मान्यवरांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंचक देशमुख यांनी केली. आभार प्रदर्शन चंद्रकांत गवळी यांनी केली.



# भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मोर्चा

## पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे प्रशासनास निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा :** जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला. सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकारांकडून करण्यात आली. याबाबतचे निवेदन सासवड पोलीस ठाण्यास देण्यात आले. पोलिस निरीक्षक एस. एस. जाधव यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी पत्रकार उपस्थित होते. निवेदन देण्यापूर्वी नगरपरिषद चौकातून मोर्चास सुरुवात करण्यात आली. पत्रकारांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. भ्याड हल्ल्याचा निषेध असो,पत्रकार एकजुटीचा विजय असो, पत्रकार संघटनेचा विजय असो, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विजय असो,लोकशाही बचाव देश वाचवा,लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा विजय असो,निखिल वागळे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है आदी घोषणा देण्यात आल्या. तसेच छत्रपती शिवाजी



महाराज यांच्या पुतळ्यासमोर जय भवानी जय शिवाजी असा जयघोष ही करण्यात आला. मोर्चा पोलीस ठाण्यात पोहचल्यानंतर निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी व असीम सरोदे यांच्या समवेत निर्भय बनोच्या सभेला जात असताना भाजपच्या गुंडांनी जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर अर्ध्या तासात चार वेळा पाठलाग करून दगड लाठ्या काठ्या हॉकीस्टिक तसेच लोखंडी रॉड यांच्या साहाय्याने प्राणघातक हल्ला चढवला. हा हल्ला पूर्वनियोजित तसेच पोलिसांच्या सहमतीने झाल्याचाही आरोप होत आहे. वागळेंवरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी आम्ही सर्व पत्रकारांद्वारे आपणांस सदर निवेदन सादर करत आहोत. सर्वच दोषींवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे. पत्रकारांनी मनोगताद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर वारंवार हल्ले होत आहेत. पत्रकार संरक्षण कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. असे सुद्धा पत्रकारांनी म्हटलेले आहे. यावेळी योगेश कामथे, निलेश भुजबळ, प्रवीण नवले, अमोल बनकर, सुनील लोणकर, बी. एम. काळे, दत्तानाना भोंगळे, एम. जी. तात्या शेलार, निखिल जगताप, सुजाताई गुरव, छायाताई नानगुडे, संतोष दुबल, संतोष जंगम, अमृत भांडवलकर, आझीम आतार, निलेश जगताप, हनुमंत वाबळे, प्रा. राजेश काकडे, ए. टी. माने, शिवदास शितोळे, राहुल शिंदे, रामदास लांघी, सुनील धिवार, सचिन मोरे आदीसह इतर उपस्थित होते.



# कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या मुलींच्या वस्तीगृहात व मुलींची वस्तीग्रह 4 घनसावगी  येथे वार्षिक स्नेहसंमेलन व दहावी बारावी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.या वेळी  मा. गटशिक्षणाधिकारी रवी जोशी व मा.विस्तार अधिकारी सोळुंके,  मॉडेल कॉलेजचे प्रा. डॉ.कन्नूलाल विठोरे, मुख्याध्यापक श्रीमती चिपाडे व गृहप्रमुख सपना देवकर व लेखापाल श्रीमती वैशाली तांगडे व इतर मान्यवर व विद्यार्थी वर्ग व मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी मराठी, हिंदी गीतावर सुंदर नृत्य प्रस्तुत करत सर्वांची मने जिंकली.



# मूलमध्ये सासू-सून मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दि. 11 फेब्रुवारी 2023 रविवारी मुल येथे यांच्या वाढदिवसानिमित्त आगळ्यावेगळ्या सासू सून मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्याला शंभराच्या वर सासु सुनेचा जोड्यांनी सहभाग घेतला यावेळी सुरुवात सासु सुना मधील एक मिनिट संवाद स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, वेगवेगळे खेळ यावेळी घेण्यात आले तसेच मी सावित्री बोलते या एकांकिका अप्रतिम असे सादरीकरण सौ कविता संगोजवर यांनी केले. सासु सुनांच्या दैनंदिन जीवनावर आधारित लघु नाटिकेचे सादरीकरण शुभांगी शेंडे व त्यांच्या टीमने केले. चंद्रपूरचे सुप्रसिद्ध क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ. दुर्गाप्रसाद बनकर यांच्या नांदा सौख्यभरे या प्रबोधनातून सासु सुनांमधील संवाद तसेच दोन व्यक्तींमधील संवाद सुधारण्यासाठी कुठल्या महत्त्वाच्या बाबी असतात यावर सखोल असं मार्गदर्शन झालंकुटुंबाचे स्वास्थ्य जपण्यासाठी व सुदृढ नवीन पिढी निर्माण करण्यासाठी सासु सुनांमधील सुसंवाद किती आवश्यक आहे. यावर बनकर सरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व संसारिक महिलांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक मंच उपलब्ध करून देता यावा म्हणून हा कार्यक्रम घेण्यात आला, असे आयोजक डॉक्टर अभिलाषा ताई गावतुरे यांनी सांगितले. सीमा लोणबुले, शुभांगी शेंडे, रत्नाताई चौधरी, आशाताई नागोसे, पुनम मोहूरले, कविता सांगोजवार यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. आंबेडकर चौकातील अतिक्रमण काढा : पगारे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषद हद्दीतुन राष्ट्रीय महामार्ग NH-752H गेलेला असून सदर रस्त्यामध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असून सदर पुतळा परिसरास 6.00 मीटरचा चौरस दिलेला असून हा चौक  अत्यंत लहान असून चौकशी करून आजूबाजूचे अतिक्रमण तात्काळ काढण्यासाठी आज दिनांक 12 फेब्रुवारी वार सोमवार रोजी बसपा चे जिल्हा प्रभारी बाबासाहेब पगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमरण उपोषण करण्यात आले होते.

या संदर्भात निवेदन देण्यात आले होते प्रसंगी नगरपरिषद तर्फे या विषयी व संदर्भीय निवेदनात नमूद केलेला राष्ट्रीय महामार्ग NH-752H हा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या आख्त्यारीत असून सदरील महामार्गाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार हे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास आहेत.

त्यांनी सदर महामार्गाचे हद्द निश्चिती करून त्याप्रमाणे खुणा करून अतिक्रमण काढणेबाबत कार्यवाही प्रस्तावित केल्यास नगर परिषदेमार्फत त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. करिता या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेशी संपर्क साधणार असून प्रकरण निकाली लावणार असल्याचे पत्र नगरपरिषद वैजापूर मार्फत देण्यात आले त्यानंतर हे आमरण उपोषण स्थगित करण्यात आले.



# संगीतमय शिवमहापुराण कथेचा लाभ घ्यावा : प्रा. जीवन कोलते पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील फत्तेपूर येथे संगीतमय शिवमहापुराण कथा, संकीर्तन सप्ताहाचे आयोजन दि.११/२/२४ ते १८/२/२४ फेब्रुवारी पर्यंत आयोजन करण्यात आले आहे सावळदबारा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे.श्री संत ज्ञानेश्वर माऊली प्रतिष्ठांनचे सदस्य नेहमीच समाज प्रबोधन, सामाजिक कार्य असो की धार्मिककार्यअसो प्रत्येक कार्यात निस्वार्थपणे, हिरीरीने भाग घेऊन ते कार्य यशस्वीपणे पार पाडत असतात. अनेक धार्मिक उपक्रम यशस्वी करून दाखविले आहेत समाज प्रबोधन करणेसाठी प्रतिष्ठांनने आळंदी येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी मंदीराचे उत्तराधिकारी ह.भ.प. विष्णु केंद्रे महाराज यांच्या प्रेरणेतुन गेल्या वर्षापासून कथा व किर्तन सप्ताहाचे आयोजन सुरु केलेले आहे.या वर्षी प्रसिद्ध शिवमहापुराण कथा प्रवक्ते व -प्रसिद्ध व नावाजलेले किर्तनकार महाराज गण यांच्या मधूर वाणीतून सप्ताहाचे आयोजन दि.११ फेब्रु. ते १८ फेब्रुवारीच्या दरम्यान सुखदेव



नगर मधील बेलेश्वर महादेव स्थळाजवळ करण्यात आलेले आहे. नाशिक येथील स्वरगंधर्व तथा महाशिवपुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. अनिल - महाराज तुपे हे आपल्या "अमृत वाणीतून संगितमय महाशिवपुराण कथा वाचन" दररोज दुपारी-१ते५ दरम्यान करणार आहेत. सप्ताहात दैनदिन काकडा सकाळी-५ते६शिवमहापुराण कथा-१ ते ५, हरिपाठ-५-३० ते ६-३०, व दररोज रात्री हरि किर्तन- ८-३० ते १०-३० या वेळेत होणार आहे. त्या मध्ये दि. ११ फेब्रु. रोजी सकाळी ८ ते ११ वेळेत नगर प्रदक्षीणा व कलश यात्रा निघणार आहे. रात्री- जालना येथील संघर्षकन्या ह.भ.प. ज्योती धनाडे, दि.१२ फेब्रु. रोजी खान्देश रत्न भोजेकर समाधान महाराज, दि. १३ फेब्रु. रोजी संभाजीनगर येथील शिवसाधीका साध्वी ह.भ. प. दुर्गादिदी, दि.१४ फेब्रु. रोजी नाशिक येथील स्वरगंधर्व ह.भ.प. अनिल महाराज तुपे दि.१५ फेब्रु.रोजी आळंदी येथील महिला किर्तनकार शितलताई साबळे, दि.१६फेब्रु. रोजी बीड येथील साध्वी महिला किर्तनकार ह.भ.प. सोनाली कर्पे, दि.१७ फेब्रु.रोजी विदर्भरत्न जळगांव जामोद येथील ह.भ.प. शिवा महाराज बावस्कर, दि.१८ फेब्रु. रोजी रामायणाचार्य ह. भ.प.पारस महाराज जैन यांचे काल्याचे किर्तन ठीक सकाळी-९ ते १२ वेळेत होणार आहे. त्यानंतर जवळच असलेल्या छत्रपतीशिवाजी महाराज मंगलकार्यालयात महाप्रसादाचे आयोजन-१२ ते ३ या वेळेत केलेले आहे.सप्ताहात येणाऱ्या भाविक भक्तासाठी, महाराज मंडळीची राहण्याची व जेवनाची व्यवस्था विविध अन्नदात्यांनी केलेली आहे. त्याच प्रमाणे सप्ताहात चहापाणी व्यवस्था, पाणी व्यवस्था, जेवनाची व्यवस्था मंडप व्यवस्था, पत्रिका व साऊंड, जागा, व्हिडीओ शुटींग,  विणेकरी, अशा गायक, वादक, टाळकरी, चोपदार अनेक जबाबदाऱ्या विविध दात्यांनी घेतलेल्या आहेत. तरी भाविक भक्तानी व समाज बांधवानी या अमृत योगाचा लाभ घावा. असे आवाहन गांवकरी मंडळी व माऊली प्रतिष्ठानच्या वतीने प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा ता सोयगाव यांनी केले आहे.

# भाजपतर्फे वैजापुरात 'गाव चलो अभियान'

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भाजप पक्ष संघटनेकडून ४ फेब्रुवारी  ते ११ फेब्रुवारी दरम्यान मतदारांची व्यापक जन संपर्का साठी वैजापूर विधानसभा मतदार संघामध्ये गाँव चलो अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात भाजपाचे विधानसभा प्रमुख डॉ.दिनेश परदेशी, राज्य कार्यकारिणी सदस्य एकनाथ जाधव, जिल्हा उपाध्यक्ष कल्याण दांगोडे, तालुकाध्यक्ष नारायण कवडे, ज्ञानेश्वर जगताप, कैलास पवार ,सुनिल पैठणपगारे आदींसह १७५ प्रमुख पदाधिकारी त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार आहेत. अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी दिली. भाजपा कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला एकनाथ जाधव, डॉ. दिनेश परदेशी, गाव चलो अभियान जिल्हा संयोजक मधुकर वालतुरे, तालुकाध्यक्ष नारायण कवडे यांच्यासह तालुका व शहर पदाधिकारी उपस्थित होते. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तम संघटनात्मक बांधणी करत, विकासाचा अजेंडा डोळ्यांसमोर ठेवून भाजप कार्य करत आहे. मोदीजींची गॅरंटी काय आहे, हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी मागच्या १० वर्षांतील मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रके वितरित करण्यात येणार आहे. प्रत्येक युनिटमध्ये भाजपचा प्रवासी नेता एक दिवस मुक्काम करून बूथप्रमुखांच्या बैठका, नागरिकांच्या भेटी, नवमतदारांशी चर्चा अशी आखून दिलेली १८ संघटनात्मक कामे करणार आहे.



# धर्मादाय रुग्णालयांनी उपचारासाठी टाळाटाळ करु नये : वैरागर

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** गरीब रुग्णांना चांगले उपचार मिळावेत यासाठी धर्मदाय रुग्णालयात निर्धन रुग्ण व दुर्बल रुग्ण या योजनेअंतर्गत विशिष्ट प्रमाणात बेडस राखीव असतात परंतु काही धर्मदाय रुग्णालय याबाबत रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना व्यवस्थित माहिती देत नाही अशा अनेक प्रकारच्या तक्रारी रुग्णांच्या नातेवाईकांकडून येत आहेत धर्मादाय हॉस्पिटलच्या दर्शनी भागावर सदर योजनेची माहिती फलक नसल्यामुळे अनेक वेळा नातेवाईकांची धावपळ व ससे पालट होत असते परिणामी हॉस्पिटल त्यांच्याकडून शक्तीने बिलाची आकारणी केली जाते अनेक वेळा शासन स्तरावरून याबाबत जनजागृती केली जात आहे परंतु धर्मदाय हॉस्पिटल याबाबत उदासीन असल्याचे दिसून आले आहे अनेक रुग्णांना पैसे अभावी आपले जीव गमावावे लागले आहेत अनेक वेळा पैसे नसल्याच्या कारणास्तव सिविल हॉस्पिटल येथे रुग्णांना दाखल केले जाते अशावेळी सिव्हिल हॉस्पिटल येथे गरीब रुग्णांची संख्या लक्षणीय आणि विचार करणारी आहे. माननीय उच्च न्यायालयाने 2004 मध्ये दिलेल्या निकालानुसार मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालयासाठी योजना आखून देण्यात आलेली असताना आणि स्पष्ट निर्देश दिलेले असताना निर्धन आणि दुर्बल रुग्णासाठी 20 टक्के राखीव बेड रुग्णांना देण्यास अथवा सदर योजनेस नकार दिला जातो राज्यात 486 आणि अहमदनगर जिल्ह्यात 24 धर्मदाय रुग्णालय असून रुग्णांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन फुले शाहू आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर यांनी केले आहे.

> जर कोणी आयुष्य भारत कार्ड नाकरत असेल तर व धर्मादाय रुग्णालय याबाबत रुग्णांना उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्यास धर्मादाय सहआयुक्त अहमदनगर विभाग यांच्याशी संपर्क साधावा. **–संजय वैराग़र**
> **एक लाख 60 हजाराच्या आत उत्पन्न पाहिजेत :** दुर्बल घटकातील नागरिकचे उत्पन्न एक लाख 60 हजारांच्या आत असेल त्यांना मोफत उपचार सवलतीच्या दरात केले जातात.

# ठेकेदाराकडून पूलकामात वाळूचा वापरच बंद



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात होत असलेले पुल कामात वाळुचा वापरच बंद असुण फक्त सिमेंट व बारीक दगडी चुरा याचाच वापर करून कामे होत असल्याचे चित्र आहे.

तालुक्यात कोटी रुपयांची पुल कामे सुरु असून लोणी चिकलठाणा रस्ता पुल काम, सावंगी - ताजनापूर शिरोडी रस्ता पुलकाम,जैतखेडा सावंगी रस्ता पुल काम, सुलतानपूर येथील गिरीजा नदीवरील पूल काम, खांडी पिंपळगाव रस्ता पुल काम आदि ठिकठिकाणचे पुल कामे व पुर्वी नुकतीच झालेली पुल कामे सर्व ठिकाणी वाळु ऐवजी फक्त दगडी चुरा व सिमेंट यांचे मिश्रणचा वापर करत पुल कामे सुरु आहेत.या संदर्भात सतत विभागाला आवगत करूनही यंत्रणा काहीच करायला तयार नाही.पुलकाम करताना दगडी चुरा पावडर व सिमेंट याचे मिश्रण करत पुल कामे होत आहे.हे काम दिसायला हिरवेगार व चोपडे दिसते मात्र पाण्या अभावी ठिसुर होते व या कामाची हमी लाईफ बद्दल नागरिक प्रश्न चिन्ह उभं करीत आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यास गंभीरतेने न घेता वाळु वापर विनाच कामे करत आहे.काम करताना दगडी चुरा किती वापऱ्याचे याचे ही माहिती नाही तर सिमेंट व दगडी चुरा मिश्रण केल्यावर काम हिरवगार चकचकीत दिसत असले तरी कामाचे जीवन लाईफ हमीचं काहीच घेणेदेणे नाही फक्त कामे करायची हेच धोरण सद्या विभागांनी अंगीकारले असल्याचे चित्र आहे हे विशेष.

# जि. प. शाळा टिटवी येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज



**यासीन शेख**

**लोणार :** जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा टिटवी येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्षस्थानी प्रकाश भाऊ मापारी (सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था लोणार),उदघाटक गिरीष जोशी तहसीलदार लोणार तर प्रमुख पाहुणे निमिष मेहत्रे ठाणेदार पोलीस स्टेशन लोणार, ठोके साहेब विस्तार अधिकारी ग्रामपंचायत, जंगलसिंग राठोड केंद्रप्रमुख टिटवी, वरकड साहेब मंडळ अधिकारी, विजय पोपळे तलाठी, तेजनकर साहेब ग्रामसेवक, उद्धवराव मापारी, सुधाकरराव मापारी, डॉ. विभुते साहेब, डॉ. घुगे साहेब राजाभाऊ घोगरे (PSI), गणेश लोंढे, धोंडगे साहेब उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमाला पवन शर्मा, संदीप मापारी, राहुल सरदार, किशोर मापारी, मयूर गोलेच्छा, नंदूभाऊ डव्हळे पत्रकार संघाची उपस्थिती लाभली. टिटवी गावातील सौ गोदावरीताई भगवानराव कोकाटे जिल्हा परिषद सदस्या,भगवान कोकाटे उपसरपंच टिटवी,अनुसयाताई प्रताप नरवाडे सरपंच टिटवी, श्याम भाऊ तनपुरे अध्यक्ष शाळा स्थापन समिती व सर्व शाळा व्य. समिती सदस्य, सर्व ग्रामपंचायत सदस्य कार्यक्रमाला उपस्थित होते.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये दर्जेदार व बहारदार गीतांचे नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले. मान्यवरांनी बक्षीस रूपात विद्यार्थ्यांचे कौतुक केले, हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी व शाळा समितीने मेहनत घेतली कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवानराव कोकाटे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुरेखा शिंदे मॅडम व आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक विजय सरकटे सर यांनी केले.

# भारतीय जन संसदची राहाता तालुका आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**कोपरगाव :** भारतीय जनसंसदच्या राहाता तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक राहाता तालुका अध्यक्ष जनार्दन शेजुळ यांचे अध्यक्षते खाली नुकतीच पार पडली. यावेळी तालुका कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. सुरेश लोखंडे ( राहाता तालुका उपाध्यक्ष), शशिकांत निलखे ( तालुका सचिव), गणेश भागवत ( राहाता शहर अध्यक्ष), व मल्हारी जेजुरकर ( शिर्डी शहर अध्यक्ष) याप्रमाणे नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यावेळी मार्गदर्शन करताना राहाता तालुका अध्यक्ष जनार्दन शेजुळ म्हणाले की, ग्रामीण भागामध्ये ग्रामसभा बहुतांशी गावात प्रत्यक्ष घेतल्या जात नाहीत त्या विषयी अजूनही खूपच उदासीनता दिसून येत आहे त्यामुळे ग्रामसभेला व्यापक प्रमाणात जनजागृती करून लोकांचा ग्रामसभेत सहभाग वाढला पाहिजे यासाठी एक कृतिशील कार्यक्रम तयार करण्यात आला आहे त्या प्रमाणे काम चालू होणार आहे. तसेच ग्रामपातळीवर शासनाने गठित केलेल्या वेगवेगळ्या १४ समित्या कार्यरत असल्याच पाहिजे निव्वळ कागदावर राहून त्याचा उपयोग नाही. कर्तव्यावरअसलेले शासकीय कर्मचारी हे मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करत नाहीत ते कुठेतरी दुसरीकडे घर करून राहतात, त्यामुळे त्यांचा येण्या जाण्यात वेळ खर्ची पडतो, कामकाजात दिरंगाई होते, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यामुळे स्थानिक गाव पातळीवर होणाऱ्या आर्थिक उलाढालीत घट होते कारण एका गावात वेगवेगळे जवळपास १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतात त्यामुळे त्यांच्या गरजेच्या वस्तूंची खरेदीच्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल होऊ शकते ती होत नाही त्याचा ग्रामीण अर्थकारणावर विपरीत परिणाम होत आहे म्हणून हे सर्व कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी कसे राहतील या विषयी शासन स्तरावर व्यापक प्रमाणात पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. असे सर्वानुमते ठरविण्यात आले. किसन पवार यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी श्रीरामपूर तालुका अध्यक्ष रंजन लोखंडे, किसन पवार, सोमनाथ दरंदले, राजेंद्र जगताप, मल्हारी जेजूरकर, सुरेश लोखंडे, शशिकांत निलखे, गणेश भागवत, रमेश काहांडळ, बाळासाहेब मेहेत्रे, उपस्थित होते. शेवटी शशिकांत निलखे यांनी आभार मानले.

# नेवासा येथे रक्तदान शिबिरात ५१ जणांनी केले रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ,नाणीजधाम व महाराष्ट्र शासन आयोजित राज्यात महारक्तदान शिबीराला दि.१० फेब्रुवारी पासून सुरुवात झाली त्यात नेवासा येथील गरुटे गल्लीत असलेल्या डॉ.वाघ हॉस्पिटलमध्ये झालेल्या शनिवारी झालेल्या रक्तदान शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले.

शनिवारी दि.१० फेब्रुवारी रोजी नेवासा येथील गरुटे गल्लीतील वाघ हॉस्पिटलमध्ये सदरचे रक्तदान सकाळी ८ ते सायंकाळी ५ वेळेत पार पडले.यावेळी भाजप महिला मोर्चाच्या मार्गदर्शक सौ.आशाताई मुरकुटे, नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या नेवासा भक्त परिवाराच्या वतीने डॉ.मनिषा वाघ व नेवासा तालुका मराठा सकल समाजाचे युवा नेते भाऊसाहेब वाघ यांच्या हस्ते स्वामी नरेंद्राचार्य यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.सौ.आशाताई मुरकुटे यांनी रक्तदानासारख्या पवित्र कार्यात पुण्याचे कार्य आजपासून महारक्तदान शिबिरातून सुरू झाले आहे,राष्ट्रीय कर्तव्य समजून रक्तदानामध्ये सहभागी व्हा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी जिल्हा परिषदेच्या सदस्या विजयाताई अंबाडे,कुकाणा येथील डॉ.बाळासाहेब कोलते, नेवासा येथील बहुजन समाजाचे नेते नितीन मिरपगार,धर्म रक्षक गणेश चौगुले,जगदगुरू नरेद्राचार्य महाराज संस्थान अहमदनगर जिल्हा निरीक्षक दत्तात्रय उन्हाळे, जिल्हाध्यक्ष सयाजी भडांगे,जिल्हा ब्लड निड प्रमुख सतीश गडाख, जिल्हा संजीवनी प्रमुख योगेश जाधव,तालुकाध्यक्ष चंद्रशेखर कोळसे, तालुका युवा प्रतिनिधी कृष्णा वाबळे, नंदाताई गरुटे, आशा भुसारी,चांगुणाबाई मरगळ, अश्विनी मरगळ, बेबीताई मरगळ, सतिष लोखंडे, अनिकेत भुसारी, बाबासाहेब मरगळ यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून स्वःत सहभाग नोंदवला.

यावेळी बोलताना डॉ.मनिषा वाघ म्हणाल्या की अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने स्व-स्वरूप संप्रदाय तर्फे दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करत असतो,या वर्षी राज्यात एकून ८०० कॅम्प घेण्यात येणार आहे,

आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल अनेमिया, हिमोफिलीया, थॅलॅसेमिआ,ब्लडकॅन्सर,किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्तबाटल्या देण्याचे आमच्या संप्रदायामार्फत निश्चित केले असल्याने यासाठी राज्यभर महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.



# पत्रकार डॉ. मापारी यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**यासीन शेख**

**लोणार :** जय हिंद सेवाभावी शिक्षण संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ३१ मान्यवरांना दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी परभणी येथील एम. ए. हॉल मध्ये दुपारी दोन वाजता महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लोणार येथील जेष्ठ पत्रकार बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे सचिव तथा नगरसेवक डॉ. अनिल मापारी यांना जय हिंद सेवाभावी शिक्षण संस्थेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा खासदार ॲड. गणेश दुधगावकर व संस्थेचे अध्यक्ष अब्दुल सत्तार इनामदार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. अनिल मापारी मागील गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे करत आहे लोणार तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, जिल्हा पत्रकार संघाचे सचिव तसेच वैद्यकीय, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात त्यांनी आपले कार्य केले. पत्रकार व नगरसेवक म्हणून सद्यस्थितीत ते काम पाहात आहेत. त्यांचा पत्रकारिता क्षेत्रासह तालुक्याच्या राजकारणात विशिष्ट दबदबा आहे.आपल्या लेखणीतून गोरगरीब सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम ते सातत्याने करीत असल्यामुळे जय हिंद सेवाभावी संस्थेने त्यांच्या कार्याची दखल घेतली. जय हिंद सेवाभावी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अब्दुल सत्तार इनामदार यांनी परभणी येथे त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपमहापौर भगवान वाघमारे, इंजिनिअर आर.डी. मगर,लोणार शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद,माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे, हिंदी कवी इमरान राही, गफार मास्टर, विशाल बुधवंत, खदीरलाला हाश्मी, स्वागताध्यक्ष ॲड. निलेश पुरी, मोहम्मद इलियास कच्ची, हाजी शरीफ शेख, मोईन कॅप्टन,योगेश मुळी, तब्बू पटेल, मोहम्मद रईस इनामदार, शफिक चारठाणकर, सुरेश पाथरकर, पाशा पटेल उपस्थित होते.

# अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील अंढेरा नजीक अवैध वाळू वाहतूक करतांना टिप्पर जप्त करण्यात आले. सदर टिप्पर अंढेरा पोलीस ठाण्यात अटकाव करण्यात आले आहे. नायब तहसीलदार अस्मा मुजावर ह्या अवैध वाळू प्रतिबंधक पथकात गस्तीवर असताना अंढेरा फाट्या नजीक पिवळ्या रंगाचे टिप्पर क्रमांक एम एच २८ ए बी ९१९९ हे चिखलीच्या दिशेने जाताना दिसले असता सदर वाहन अडवून चौकशी केली असता अंदाजे चार ब्रास वाळू विना परवाना आढळून आली. टिप्पर चालक हर्षल सांडू देवकर, रा.भानखेड, यास विचारणा केली असता सदर टिप्पर सचिन देविदास चित्ते राहणार निमगाव गुरु यांच्या मालकीचे असल्याचे समजले. सदर टिप्पर जप्तीची कारवाई करून नायब तहसीलदार आसमा मुजावर यांनी अंढेरा पोलिसात अटकाव केले आहे.

# निकीता नलावडेची वनरक्षकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी



येथील कु.निकीता नवनाथ नलावडे हीची यवतमाळ येथे वनरक्षक पदी निवड झाल्याने त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. नुकतेच रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल मध्ये त्याचे संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षका कडून स्वागत सत्कार करण्यात आले व ठिकठिकाणी सत्कार स्वगत होत आहे.

# रवी पुंड यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी



येथील पदवीधर विद्यार्थी रवि श्रीधर पुंड (वय २४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. अकाली निधनाने गाव व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. बाजार ठेकेदार तथा सामाजिक कार्यकर्ते श्रीधर पुंड यांचा पुत्र होत.

# आयफा फिल्म फेस्टिव्हलच्या धर्तीवर आता मराठी चित्रपट उत्सव : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्याच्या



कथानकामध्ये एक अद्भूत शक्ती असते. डॉक्टरपेक्षा चित्रपटाच्या डायरेक्टरचा हात प्रेक्षकांच्या थेट हृदयापर्यंत पोहचतो. अशी चित्रपटसृष्टी राज्यात टिकली पाहिजे, यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असून फिल्म फेस्टीवलच्या धर्तीवर आता भव्यदिव्य मराठी चित्रपट उत्सव सुरू करणार असल्याची ग्वाही राज्याचे सांस्कृतिक मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. चंद्रपूर येथील मिराज सिनेमा येथे दुस-या चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर प्रसिध्द दिग्दर्शक तथा पुणे फिल्म फेस्टीवलचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, जिल्हाधिकारी विनय गौडा, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, प्रसिध्द दिग्दर्शक समर नखाते, वल्ली चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज शिंदे, अभिनेता देवा गाडेकर यांच्यासह हरीश शर्मा, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे, प्रकाश धारणे आदी उपस्थित होते. भाषेपूर्वी अभिनयातून संवाद साधला जात होता, असे सांगून मंत्री मुनगंटीवार म्हणाले, 1913 मध्ये आलेला 'राजा हरीशचंद्र' हा चित्रपट मूकपट होता. अभिनयातून तो प्रेक्षकांना कळला. 1932 मध्ये 'अयोध्येचा राजा' हा चित्रपट आला. वैशिष्ट म्हणजे अयोध्येशी चंद्रपूरचे एक वेगळे नाते तयार झाले आहे. प्रभु रामाच्या मंदिरासाठी चंद्रपूर जिल्ह्याचे सागवान गेले असून कुठल्याही भाविकाला अयोध्या येथे दर्शनासाठी चंद्रपूरच्या लाकडाच्या दरवाज्यातूनच जावे लागेल, असा उल्लेख त्यांनी आवर्जुन केला. पुढे मुनगंटीवार म्हणाले, महाराष्ट्राचे वर्णन हे 'चांदा ते बांदा' असे केले जाते. त्यामुळे गत दोन वर्षापासून फिल्म फेस्टिवल चंद्रपूरमध्ये घेण्याचा निर्णय घेतला. चंद्रपूर जिल्हा हा खनीज आणि कोळसाकरीता प्रसिध्द आहे. कोळसा खाणीत हिरा सापडतो तसे चंद्रपूरमध्ये अभिनयातील कोहीनूर आहेत. जयंत सोमलकर, 'एका रात्रीचा पाऊस' या चित्रपटाच्या निर्मात्या प्रतिष्ठा ताई ह्या चंद्रपूरच्या आहेत. आपल्या जिल्ह्यात कलाकारांची कमी नाही, त्यांना संधी मिळवून दिली तर नक्कीच ते संधीचे सोने करतील, त्यासाठीच चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल घेण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून येथील कलाकार प्रेरणा घेऊन अभिनय, दिग्दर्शन, निर्माता या क्षेत्रात आपला ठसा उमटवतील. येथील कलाकाराला राष्ट्रीय फिल्म फेअर अवार्ड मिळावा व चंद्रपूरची शान जगामध्ये वाढावी, असा आशावाद सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. चंद्रपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलचे हे दुसरे वर्ष आहे. चंद्रपूर आणि आजुबाजूच्या परिसरात चित्रपटाच्या शुटींगकरीता लागणारे सुंदर लोकेशन आहे. येथेही अभिनेते आणि दिग्दर्शक घडावे, यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जागतिक सिनेमा चंद्रपुरात आणला, असे गौरवोद्गार प्रसिध्द दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी काढले. पुढे ते म्हणाले, जगातील सामाजिक आशय आजचा तरुण टिपत आहे. समाजामध्ये शांततेचा संदेश देण्यासाठी यावर्षी पांढरे कबुतर हे चित्रपट महोत्सवाचे बोधचिन्ह ठेवले आहे. मुंबईबाहेर चंद्रपूर, लातूर, औरंगाबाद येथेही पुणे फिल्म फेस्टीवलचे आयोजन होत आहे. या तीन दिवसात चंद्रपूरकरांसाठी उत्कृष्ट चित्रपटांची मेजवानी पालकमंत्री सुधीरभाऊंनी उपलब्ध करून दिली आहे, याचा प्रेक्षकांनी लाभ घ्यावा. कारण सुधीरभाऊंमध्ये उत्कृष्ट रसिकता असल्यामुळेच हे शक्य झाले आहे, असेही डॉ. जब्बार पटेल म्हणाले.

**मुंबईच्या फिल्मसीटी बाहेर चित्रपटाची शुटींग नि :शुल्क :** मुंबई फिल्मसिटीबाहेर इतर जिल्ह्यात चित्रपटाची शुटींग करायची असेल तर 'वन विंडो सिस्टीम' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शुटींगसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

**75 नाट्यमंदिराची निर्मिती :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तसेच नाट्य परिषदेचे हे 100 वे वर्ष असल्यामुळे राज्यात 75 नाट्यमंदिराची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यासाठी 9 कोटी 33 लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे.

**फिल्मसिटीत सर्व सुविधा उपलब्ध होणार :** मुंबई येथील फिल्मसिटी 521 एकरमध्ये आहे. तसेच त्यालगत 104 चौ. किमी. मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. या ठिकाणी चित्रपटासाठी लागणाऱ्या सर्व अत्याधुनिक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**मान्यवरांचा सत्कार :** यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रसिध्द दिग्दर्शक समर नखाते, वल्ली या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज शिंदे, अभिनेता देवा गाडेकर, मिराज सिनेमाचे रौनक चोरडीया यांचा सत्कार करण्यात आला.



# मा.आ. भांबळेंच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मौजे माणकेश्वर येथील भाजप कार्यकर्ते प्रभाकर शेळके, शिवाजी शेळके, रामप्रसाद डाखोरे, संतोष डाखोरे, संतोष साबळे, शेकुराव शेळके, विठ्ठल साबळे, ज्ञानेश्वर डाखोरे, तुळशीराम घाटे, आश्रोबा शेळके, नागोराव शेळके, मारुती डाखोरे, बंडू शेळके, भागवत ठाकरे, कृष्णा डाखोरे, विश्वनाथ डाखोरे, गणेश डाखोरे, समा शेळके, मदन डाखोरे, सिताराम शेळके, छत्रगुण शेळके यांनी भाजपचे सूडबुद्धीचे राजकारण व अकार्यक्षम नेतृत्व याला कंटाळून मा.आ.विजय भांबळे साहेब यांच्या नेतृवावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांनी सर्वांना हार घालून पक्षात स्वागत केले व पुढील निवडणुकीसाठी सर्व ताकतीने कामास लागून शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार व विकास तळागळापर्यंत पोहचवण्याचा सल्ला दिला.

# विलासराव देशमुख उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा जिंतूर येथे सांस्कृतिक कार्यक्रम

**जिंतूर :** दि. 10 फेब्रुवारी शनिवार रोजी विलासराव देशमुख उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात बारावी विज्ञानचे विद्यार्थी शेख सूफ़ियान शेख हारून यांच्या कूरआन पठनाने करण्यात आली, भाषांतर शेख अबूज़र शेख जमील यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अहेमद सिद्दिकी सर यांनी सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष आसेफोद्दीन सिद्दिकी तर उद्घाटक मा.आ. विजयराव भांबळे हे होते. प्रमूख अतिथी म्हणून मौलाना अब्दुल जलील, डॉ. शेख इसहाक़ सर (ज्ञानोपासक महाविद्यालय जिंतूर), मा.रामराव उबाळे (मा. जि.प.सदस्य), मा. वासेफोद्दिन सिद्दिकी, पत्रकार सिराजोद्दीन सिद्दिकी* यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात मौलाना अब्दुल जलील मिल्ली यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी *मा.आ. विजयराव भांबळे* यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा, कलागुण, छंद जोपासले पाहिजे. विद्यार्थ्यांनी भाषण, संगीत, चित्रकला, नाट्य इत्यादी क्षेत्रात पदार्पण करावे. अल्पसंख्याक समाजातील अनेक दिग्गज राष्ट्रपती पदापर्यंत पोहचू शकले त्यामुळे आपण स्वतःला कमी समजू नये असा सल्ला देखील दिला. तसेच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शासनाने पुढाकार घेत त्यांना वसतिगृह व ग्रंथालय बांधावे, शैक्षणिक शिष्यवृत्ती द्यावी व शिक्षणासाठी प्रेरित करावे असे मत व्यक्त केले. या वेळी डॉ. शेख इसहाक़ सर, वासेफोद्दिन सिद्दिकी आणि आसेफोद्दीन सिद्दिकी साहेब यांनी उपस्थित श्रोतागण यांचे मार्गदर्शन केले.

पंच म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक शेख अब्दुल मोईज सर, सूफ़ा कोचिंग क्लासेस चे मोहियोद्दीन खान सर आणि उ.मा.शिक्षिका असमा मॅडम यांनी काम पाहिले.

यावेळी शोएब जानिमियाँ, मिर्ज़ा शाहेद बेग, मनोहर डोईफोडे, अहेमद बागबान, मनोजभाऊ थिटे, राहुल घुले, रियाज़ चाउस (NTV पत्रकार) नफ़ीस खान (मामू), मिर्ज़ा उसामा बेग, शाहेद सिद्दीकी, सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग व मोठ्या संख्येत पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख मेराज सिद्दिकी सर यांनी केले. कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खूप परिश्रम घेतले.

# अ.भा.साने गुरुजी कथामालेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा बलसुर येथे संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** छत्रपती शिवाजी विद्यालय बलसर तालुका उमरगा येथे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला समिती जिल्हा धाराशिव, साने गुरुजी शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त साने गुरुजी कथा मालेच्या वार्षिक अधिवेशनात गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायन करून प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षण तज्ञ एम .डी.देशमुख , व प्रमुख पाहुणे शिक्षक आमदार विक्रम काळे,शामराव कराळे ज्येष्ठ समाजसेवक विचारवंत




पन्नालालजी सुराणा , कमलाकरराव भोसले, अ. भा.साने गुरुजी कथा मालेचे जिल्हाध्यक्ष डी.के.कुलकर्णी , धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, मा.शामराव कराळे अ. भा. क. समिती मुंबई, लालासाहेब पाटील आं. भा.कथामांला समिती मुंबई कार्याध्यक्ष, सुनील पुजारी , स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीपाद कुलकर्णी , डॉक्टर बी .आर पाटील अध्यक्ष मराठवाडा जेष्ठ ना .संघ , श्रीहरी जाधव मुंबई, सुदर्शन शिंदे मुंबई, डॉक्टर रामजीवन भांगडिया लातूर, के.डी. कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदिप लालासाहेब यादव (सहशिक्षक श्री संत बोधले महाराज प्रा. विद्यामंदिर डिकसळ ) व जाफर नायबखान पठाण प्राचार्य सावित्रीबाई फुले विद्यालय कळंब. यांना साने गुरुजी कथामाला ट्रॉफी ,मानपत्र, शाल ,श्रीफळ ,पुष्पगुच्छ देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला. आमदार विक्रम काळे म्हणाले की साने गुरुजी यांचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. शामराव कराळे यांनी साने गुरुजी चे कार्य व विचार सांगितले तर पन्नालाल सुराणा यांनी भारतीय संस्कृती सत्य हाच ईश्वर नीतिमत्ता यांची माहिति सांगितली. डी के कुलकर्णी म्हणाले की आजचा युवक संस्कारक्षम असणे गरजेचे आहे व प्रत्येक शाळेत साने गुरुजी कथामाला कळंब तालुका चालवतो. या कार्यक्रमाला कळंब तालुक्यातून सोपान पवार, ज्ञानेश्वर तोडकर ,मुंडे सर सावित्रीबाई फुले शाळेच्या मा.प्रा.मनोरमा शेळके , लिंबराज पाडे, अभय खंडागळे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंत सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पी .बी. सूर्यवंशी यांनी केले आभार प्रा. श्रीहरी जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# ४४ लाखांच्या गांजासह दोघांना अटक; राहता पोलिसांची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**

**शिर्डी :** राहता पोलिसांनी शनिवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सकाळी मोठी कारवाई करून दोन आरोपींना ताब्यात घेऊन ४४ लाख रुपये किमतीचा गांजा व चार चाकी विना क्रमांकाचा टेम्पो जप्त केला असून या घटनेने राहता तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

अधिक माहिती अशी राहता पोलीसांची शनिवारी नेहमी प्रमाणे ग्रस्त सुरू असताना पंचायत समिती रोडलगत पोलिसांना एक विनाक्रमांकाचा टेम्पो दिसल्याने संशय येताच चालकास गाडी थांबवण्यात सांगितले असता सदरचा चालक हा उडवा उडवीचे उत्तरे देत असल्याने सदरच्या टेम्पो राहता पोलीस स्टेशनमध्ये आणून त्याची झडती घेतली असता त्यात सात ते आठ गोण्या मिळून आल्या



ह्या गोण्यात गांजा लपवण्यात आल्याचे दिसून आले जवळपास ४५० किलो गांजा मिळून आला असून या गांजाची बाजारभावाप्रमाणे किंमत ४४ लाख ९७ हजार रुपये माहिती शिर्डी विभागाचे उपविभागीय अधिकारी शिरीष वमने यांनी दिली यात सचिन रामदास पवार व राहुल विनायक आरणे राहणार राहता अशी दोन आरोपींची नावे असून या दोन जण फरार झाले असून त्यांचा देखील तपास सुरू आहे. दोन मोबाईल मिळाले असून गांजा व टेम्पो मिळून जवळपास ५० लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या प्रकरणाचा अधिक तपास जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी शिरीष वमणे पोलीस निरीक्षक सोपानराव काकड याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी हे तपास करीत असून या दोघांवर मुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिर्डीत आज साईंची परिक्रमा मिरवणुकीचे भव्य आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबांच्या हयातीत ज्या मार्गावरून साईबाबा स्वत चाललेले आहेत व शिर्डीत जेव्हा साथीचा आजार आला होता त्यावेळी स्वतःच्या हाताने गहू दळून पिठ ज्या शिवेवर साईबाबांनी बाबांनी टाकले होते त्या निघोन शिर्डी बन राहता विरभद्र मंदिर साकुरी आदी ठिकाणी याच मार्गावरून जात असे साईबाबांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या या शिव मार्गावर परिक्रमा केल्यास अनेक साईभक्तांना ऊर्जा अनुभूती व मोठी मनशांती मिळाल्याचे अनुभव साईभक्तांना गेल्या चार वर्षात आलेले आहे साई परिक्रमेचे ही पाचवे वर्ष असून ग्रीन इन क्लीन शिर्डी फाउंडेशन शिर्डी नगरपरिषद व शिर्डी ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शिर्डीत परिक्रमेचे आयोजन होत असते.

मंगळवार दिनांक १३ फेब्रुवारी परिक्रमा महोत्सवाचे पाचवे वर्ष आहे पहाटे साडेपाच वाजता महंत मठाधिपती रामगिरी महाराज महंत काशीकानंद स्वामी परमानंद महाराज पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे नामदार दीपक केसरकर खासदार सदाशिव लोखंडे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे उपकार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे



उपजिल्हाधिकारी बाबासाहेब कोळेकर उपविभागीय अधिकारी शिरीष वमणे मुख्याधिकारी सतीश दिघे शिर्डी नगर परिषदेचे नगरसेवक माजी नगराध्यक्ष आदी विविध मान्यवरांच्या उपस्थित खंडोबा मंदिरापासून भव्य अशी मिरवणूक साईंची प्रतिमेची पूजा करून परिक्रमेला सुरुवात होणार आहे या परिक्रमेसाठी देशभरातून साईभक्त मोठ्या संख्येने येत असतात या परिक्रमा महोत्सवाचे महत्त्व दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे अशा या परिक्रमेसाठी देशभरातील साईभक्त शिर्डी या ठिकाणी येऊन आपले हजेरी लावत असतात हा परिक्रमा महोत्सव यशस्वी करण्यासाठी शिर्डी ग्रामस्थ व ग्रीन इन क्लीन शिर्डी फाउंडेशन चे सर्व सदस्य सामाजिक कार्य एक विचाराने प्रयत्न करीत आहे गेल्या काही दिवसापासून याची जोरदार तयारी सुरु आहे.



# आ. रमेश बोरनारे यांच्या हस्ते सामाजिक सभागृह कामाचे वैजापुरात लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सामाजिक न्याय विभागाकडून ग्रामीण भागात ४० गावात नवीन संविधान सामाजिक सभागृहाचे बांधकामाला प्रशासकीय मान्यता दिल्याची महिती आ.रमेश बोरनारे यांनी दिली.शहरातील जेतवन बुद्ध विहार येथे नगरविकास विभागाकडून २० लक्ष रुपये निधीतून बांधण्यात आलेल्या सामजिक सभागृहाच्या लोकार्पण समारंभ आ.रमेश बोरनारे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ.दिनेश परदेशी, माजी नगराध्यक्ष शिल्पा परदेशी, माजी उपनगराध्यक्ष हाजी शेख अकील शेख गफूर, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र सांळुके, शहरप्रमुख पारस घाटे, माजी नगरसेवक शैलेश चव्हाण, राजेंद्र गायकवाड, आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन,संजय बोरनारे, रणजीत चव्हाण, अतुल कुंदे बाजार समिती संचालक कल्याण जगताप, प्रशांत त्रिभुवन, युवा सेनेचे शहरप्रमुख श्रीराम गायकवाड, श्रीकांत सांळुके, अमीर अली, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पुंडलिक गायकवाड, कमलेश आंबेक, वल्लभ सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. वैजापूर शहरात नगरविकास विभागा मार्फत भारतरत्न आंबेडकर नगर मध्ये ४० लक्ष व जेतवन बुद्ध विहार याठिकाणी सामजिक सभागृह उभारणी कामासाठी ६० लाखांचा निधी उपलब्ध करुन दिल्याचे आ.बोरनारे यांनी सांगितले.माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी याठिकाणी पेव्हर ब्लॉक कामासाठी निधी देण्याची घोषणा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए.टी.पगारे यांनी तर सुत्रसंचालन प्रमोद पठारे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक तांबूस, प्रा. आबासाहेब कसबे, संतोष त्रिभुवन, सुनील त्रिभुवन, राजू पडवळ, गणेश त्रिभुवन, राजवीर त्रिभुवन,उपसरपंच अमोल दिवे, कैलास भाटे, सोमनाथ गायकवाड, शशी निकाळे, छोटू पवार कंत्राटदार सुनील पवार यांनी परिश्रम घेतले.

# शहरातील अग्रगण्य श्री गजानन पतसंस्थेस सहकार प्रेरणा गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** शहरातील अग्रगण्य समजली जाणारी श्री गजानन ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्थेला सहकार प्रेरणा गौरव पुरस्कार मिळाला. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई व नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या. नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने गोवा येथे झालेल्या निवासी सहकार प्रशिक्षण शिबीराप्रंसगी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात (१५ ते २५ कोटी) ठेंवीच्या गटात उत्कृष्ठ कामगीरी केल्याबददल नासिक जिल्हयातून तृतीय क्रमाकांचा " सहकार प्रेरणा गौरव पुरस्कार " मिळाला आहे. गोवा येथे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात मान्यवरांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक गजानन (आण्णा सोनजे यांचा सत्कार करून सदर पुरस्कार देण्यात आला. मागील नऊ वर्षात कळवणकरांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या श्री गजानन ग्रामीण पतसंस्थेला हा पुरस्कार मिळाल्याने संस्थेचे संस्थापक गजानन (आण्णा) सोनजे , चेअरमन यतिन सोनजे, व्हा. चेअरमन प्रमोद देवघरे, संचालक एकनाथ वालखडे, निंबा नेरकर, संजय महाजन, सुरेश येवला, प्रल्हाद दुसाने, रविंद्र कोठावदे , कुशल सोनजे, सुधाकर खैरणार, किशोर वाडेकर, नामदेव भोये, अलका सोनजे, सुनिता सोनजे तसेच व्यवस्थापक मिलिंद जुन्नरे आदींवर शहरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# रिसोड येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा कृषी महोत्सवात सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** राज्य शासनाच्या कृषी विभागाने वाशिम येथे दि.11 ते 15 फेब्रुवारी 2024 या कालावधीत कृषि महोत्सव व प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. सदर महोत्सवात रिसोड येथील कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून, त्यांनी प्रदर्शनात लावलेले दालन सर्वांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. त्या अनुषंगाने सदर दालनास जिल्हाधिकारी यांनी भेट देवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने वाशिम येथे दिनांक 11 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी 2024 या कालावधीत जिल्हा कृषी महोत्सव व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कृषी महोत्सव कृषी प्रदर्शनी मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित सुविदे फाऊंडेशन कृषि महाविद्यालय रिसोड चे



प्रदर्शनीय दालन आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या दालनाद्वारे कृषी महाविद्यालय रिसोड येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवशील व कृतिशील शिक्षणात स्वतः निर्माण केलेले विविध तांत्रिक प्रॉडक्ट त्यामध्ये मध,विविध जैविक खते व बुरशीनाशके, विविध फळ फुल व भाजीपाल्यावर प्रक्रिया करून तयार केलेले विविध पदार्थ ही विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त या दालनात एकात्मिक कीड व्यवस्थापन एकात्मिक अन्नद्रव्यव्यवस्थापन तसेच शेतीपूरक व्यवसाय व मूल्यवर्धनाच्या बाबतीतील विविध विद्यार्थ्यांनी तयार केलेली मॉडेल्स व इतर बाबी शेतकरी बंधूंसाठी प्रदर्शनासाठी ठेवली आहेत. या प्रदर्शनीमध्ये दिनांक 11 फेब्रुवारी रोजी कृषी महाविद्यालय रिसोड येथील 50 विद्यार्थ्यांनी भेट देऊन विविध तांत्रिक स्टॉलचा तांत्रिक लाभ घेतला आहे. याव्यतिरिक्त शाश्वत कृषी विद्यापीठाचे तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या दालनाद्वारे इतरांपर्यंत पोहोचण्याकरीता स्तुत्यकार्य सुद्धा केले आहे. दिनांक 11 फेब्रुवारी रोजी कृषी महाविद्यालय रिसोड च्या प्रदर्शनीय दालनास मा. जिल्हाधिकारी वाशिम भुवनेश्वरी देवी तसेच उपजिल्हाधिकारी बासू मॅडम यांनी भेट देऊन स्टॉल वरील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीशी संवाद साधला व त्यांनी स्वतः अनुभवशील व कृतिशील शिक्षणातून निर्माण केलेल्या विविध तांत्रिक प्रॉडक्टचे कौतुक केले. या भेटीदरम्यान जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री अरिफ शहा, प्रकल्प संचालक आत्मा अनिसाताई महाबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष आपतुरकर महाविद्यालयाचे तांत्रिक समन्वयक व कीटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र वाशिम श्री राजेश डवरे हे सुद्धा सउपस्थित होते. या संपूर्ण जिल्हा कृषी महोत्सवातील कृषी महाविद्यालय रिसोडच्या सक्रिय सहभागाबद्दल विस्तार शाखेचे प्राध्यापक श्री डी. डी मसूडकर, कीटक शास्त्र विभागाचे प्राध्यापक श्री डी टी बोरकर, कृषी विद्या शाखेचे प्राध्यापक सुनील जाधव, वनस्पती रोग शास्त्र विभागाचे प्राध्यापक श्री विठ्ठल बोडके व श्री मोरे तसेच संपूर्ण कृषी महाविद्यालयाची टीमकार्यरत असून या संपूर्ण महाविद्यालयाचे स्टॉलची इन्चार्ज म्हणून श्री दीपक गायकवाड हे कार्य करत आहेत. महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी गणेश डहाके, अनिकेत दळवी, ज्ञानेश चव्हाण, आदित्य कदम, कुमारी स्नेहल बोडके, कु समृद्धी सूर्या, अमिषा बागेले, यांच्यासह 100 विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत आहे.

# अडवलेला मार्ग आ. जोरगेवार यांनी करुन दिला मोकळा

## गावकऱ्यांनी मानले आभार, पक्का रस्ता बनवण्यासाठी निधी देणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** खुटळा येथील लवजी नगरकडे जाणाऱ्या मार्गात एकाचे ले - आउट असल्याने सदर ले - आउट धारकाने गावाकडे जाणारा मार्ग अडविला होता. त्यामुळे गाव-यांना अडचण निर्माण झाली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी येथे सदर रस्ता गावक-यांसाठी मोकळा करुन दिला आहे. तसेच येथे पक्का रस्ता तयार करण्यासाठी निधी देणार असल्याचे म्हटले आहे.

खुटाळा येथे लहुजीनगर आहे. मागील 40 वर्षापासून सदर गाव येथे असून या गावाकडे जाणारा एक मुख्य मार्ग आहे. मात्र मागील काही दिवसांपासून सदर मार्ग आपल्या ले - आउट मध्ये असल्याचे सांगत ले - आउट धारकाने गावक-यांचा रस्ता बंद केला होता. अशात गावक-यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. दरम्यान गावातील एका मुलीची प्रकृती खराब झाली. तीला रुग्णालयात नेण्यासाठी सदर मार्गाचा वापर करु दिल्या गेला नाही असा आरोप गावक-यांनी केला आहे. ही बाब कळताच आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी गावाला भेट देत गावक-यांची समस्या समजून घेतली. यावेळी संबधीत ले - आउट धारकाला बोलावून त्याची समज काडण्यात आली असून सदर मार्ग पुन्हा गावक-यांसाठी मोकळा करण्यात आला आहे.



तसेच सदर मार्गाचे पक्के बांधकाम करण्यासाठी आवश्यक तिथका निधी आपण उपलब्ध करुन देउ अशी ग्याही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी गावक-यांना दिली आहे. गावकडे जाण्याचा मार्ग कोणीही अडवू शकत नाही. यापुढे असा प्रकार घडता कामा नये. असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. यावेळी गावक-यांनीही आमदार किशोर जोरगेवार यांचे आभार मानले आहे. या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, जय मिश्रा यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची आणि गावक-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# खंडाळा तालुकाच नव्हे तर सातारा जिल्हा शिवसेनामय करणार : रामदास कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ज्या शिवसेनेने अनेकांच्या अस्तित्वाला आकार दिला.त्याच शिवसेनेला खिंडार पाडण्याचे काम केले असले तरी ओरिजिनल शिवसेना ही आमची आहे.जनता आमच्या सोबत आहे. शिवसेना फुटीनंतर आदरणीय उद्धव ठाकरे साहेब यांची ताकत कमी होईल.असे अनेकांना वाटत आहे. परंतु खरे शिवसैनिक हे उद्धव ठाकरे यांच्या सोबत आहेत. त्यामुळे जनतेच्या मनात रुजलेल्या शिवसेनेला कुणीही त्यांच्या मनातून हटवू शकत नाही.येणाऱ्या निवडणुकीच्या काळात जनता उद्धव ठाकरे यांना बळ देताना दिसेल.गावा गावात

आम्ही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करणार आहोत.

हा खंडाळा तालुकाच नव्हे तर सातारा जिल्हा त्यांच्या सोबतच असणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख व शिवसेना उपनेते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या ताकतीने आम्ही उध्दव बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहोत.खंडाळा तालुकाच नव्हे तर सातारा जिल्हा शिवसेनामय करणार आहे.असे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे यांनी म्हटले आहे.

खंडाळा तालुक्यातील काही पदाधिकाऱ्याच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या असून या निवडीबद्दल रामदास कांबळे यांच्या सह अनेकांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केलेले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाच्या खंडाळा तालुका प्रमुख पदी सागर कदम यांची तर शहिदभाई तांबोळी यांची शिरवळ शहरप्रमुख पदी निवड करण्यात आलेली आहे.या निवडीबद्दल



बोलत असताना शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे यांनी पक्षीय ध्येय धोरणे याबद्दल विचार व्यक्त करत असताना जनतेचा आवाज हा आमच्या सोबतच असल्याचे म्हटले. रामदास कांबळे पुढे म्हणाले की, वंदनीय हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमी मराठी माणसाच्या अस्तित्वाचा लढा लढला.त्यांच्याच कार्याचा वारसा घेऊन आदरणीय उध्दव ठाकरे साहेब हे पुढे चाललेले आहेत. शिवसेना ही २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण करते.आमच्या शिवेसेनेची बांधिलकी ही जनतेशी आहे. जनता हेच आमचे दैवत आहे.त्यामुळे शिवसेनेत ज्यांनी जनतेच्या विश्वासाला तडा दिला आहे.अशांना जनताच जागा दाखविणार आहे.

जनतेची नाळ ही उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबतच जोडली गेलेली आहे.त्यामुळे आजही खरे शिवसैनिक हे आमच्या सोबतच आहे.आपल्या लोकशाहीला जिवंत ठेवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष आजही झटत आहे.

लोकांच्या अनेक समस्यांना मांडत आहे.ही जनता आहे.म्हणून आम्ही आहोत.याची जाणीव आजही उद्धव ठाकरे यांच्या सह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते,पक्षाचे आमदार,खासदार यांच्या मध्ये आहे.हा विश्वास प्रत्येका मध्ये आहे. डोक्यात कोणतीही हवा जाऊन न देता इथल्या खऱ्या शिवसैनिकाचे पाय आजही जमिनीवर आहेत. असे सुद्धा रामदास कांबळे यांनी म्हटले.खंडाळा तालुका शिवसेना पदाधिकारी आणि महिला आघाडी व युवा सेना यांच्या माध्यमातून उध्दव ठाकरे यांच्या सोबत असलेले शिवसैनिक पाहायला मिळत आहेत.

काही महिन्यांपूर्वीच रामदास कांबळे यांनी सुद्धा उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन पक्षात प्रवेश केला होता.कठिण समयी अनेक लोकं उद्धव ठाकरे यांना सोडून गेली असली तरी एक आंबेडकरी चळवळीचा कार्यकर्ता म्हणून उद्धव ठाकरे यांच्या पक्षात अडचणीच्या काळात काम करण्याची संधी मिळाली. याचे नेहमी समाधान वाटत असल्याचे रामदास कांबळे सांगत असतात. सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी ह्याच पक्षाच्या म्हणजेच ओरिजिनल असलेल्या आमच्या शिवसेनेच्या माध्यमातून काम करता येत आहे. ही भावना सुद्धा त्यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य सुध्दा ते करत असतात. पक्षाच्या माध्यमातून अनेक समस्या मांडण्यासाठी तत्पर तर आहेतच शिवाय अन्याय अत्याचाराच्या ठिकाणी सुद्धा ते आवाज उठवत असतात.ही लोकशाही टिकली पाहिजे.लोकांचे हक्क आणि अधिकार अबाधित राहिले पाहिजेत. यासाठी आजही अनेक लोकं आपल्या शिवसेनेकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत.इथल्या हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात आपली शिवसेना निर्भीड पणे टक्कर देत लढत राहील.हाच विश्वास जनतेमध्ये असल्याने जनता उद्धव ठाकरे यांनाच बळ देण्यासाठी सज्ज आहे, असा विश्वास सुद्धा रामदास कांबळे यांनी व्यक्त केला. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात आणि नितीन बानगुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खंडाळा तालूकाच नव्हे तर संपूर्ण सातारा जिल्ह्यात आम्ही सर्व शिवसैनिक जोमाने काम करणार आहोत, असे सुद्धा रामदास कांबळे यांनी सांगितले.

# गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदत द्या : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हयातील काही तालुक्यात शनिवारी (१० फेब्रु) झालेला अवकाळी पाऊस व गारपीटमुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तत्काळ मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

१० फेब्रवारी रोजी जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती, चंद्रपूर, पोंभूर्णा या तालुक्यात अवकाळी पावसासह गारपीट तर ब्रम्हपुरी, नागभीड, राजूरा, कोरपना, मूल व इतर तालुक्यात अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे हरभरा, गहु, तूर, ज्वारी, जवस व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्यात यावी, असे निर्देश सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. तसेच जिल्हा प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पालकमंत्री कार्यालयालासुध्दा सादर करावा, अशाही सूचना त्यांनी दिल्या. आपदग्रस्तांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असून कोणीही मदतीपासून वंचित राहू नये, अशा पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देशही मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

# कैलाश खेर यांच्या कार्यक्रमात पावसामुळे उत्साहावर विरजण

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** प्रसिद्ध गायक कैलाश खेर यांना बघण्यास व ऐकण्यास वर्धेकर रसिकांनी चांगलीच गर्दी केली होती. पण पावसाने या उत्साहावर विरजण टाकल्याने खेर यांच्या गायनाची काही खैर राहली नाही. शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे स्वावलंबी शाळेच्या मैदानावर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी सायंकाळी सहाची वेळ देण्यात आल्याने रसिक पाचपासूनच गर्दी करू लागले. त्यात व्हीआयपी पास असलेले अडकले. मात्र कसेबसे पोहचले आणि त्यातच पावसाचे आगमन झाले. जो तो आडोसा शोधू लागला. शेवटी मिळून काहींनी जमिनीवर टाकलेली मॅट डोक्यावर धरली. पण त्याने पावसापासून काही बचाव होत नसल्याचे दिसून आल्याने बसण्यासाठी आणलेल्या खुर्च्याच लोकांनी डोक्यावर धरल्या. रात्रीचे नऊ वाजले तरी खेर यांचे आगमन होत नसल्याचे पाहून डोक्यावर खुर्ची घेत लोकं पाय काढता घेऊ लागले. खुर्चीत शीर आणि खाली धड, असे गमतीदार दृष्य सर्वत्र दिसू लागले. गायक कैलास खेर यांचे पावसातच आगमन झाले. सोबत खासदार रामदास तडस, आमदार डॉ. पंकज भोयर, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ, भाजपचे पदाधिकारी स्टेजवर पोहचले. लोकांना अभिवादन करीत कार्यक्रम आटोपता घेण्याचा निर्णय झालाच होता. पण गायनास सुरवात करीत नाही तोच तांत्रिक अडचण आली. माईक बंद पडला.

# आदिवासी मुलामुलींच्या वसतिगृहात संयुक्तरित्या क्रीडा महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** छत्रपती संभाजीनगर येथील आदिवासी मुलां व मुलींचे वसतिगृह (विभागीय स्तर) येथे संयुक्तरित्या क्रिडा महोत्सव व स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन एकदिवसीय कार्यशाळेने समारोप करण्यात आला.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगर येथे प्रकल्प अधिकारी देवकन्या प्र. बोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वसतीगृहातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता क्रिडा महोत्सव व स्पर्धा परीक्षेचे आयोजन, विविध कल्याणकारी शासकीय योजनांची माहिती प्रसार व प्रसिद्धी तसेच विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दिनांक 08 फेब्रुवारी 2024 रोजी वसतीगृहातील विद्यार्थी कार्यक्रम कृती समिती मार्फत सर्व मुला मुलींच्या वस्तीगृहात सामान्य ज्ञान स्पर्धेचे व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दिनांक 09 फेब्रुवारी 2024 रोजी विविध मैदानी खेळांचे आयोजन उद्‌घाटन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्‌घाटन श्रीमती देवकन्या बोकडे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यशाळेत प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून एम.पी लॉ कॉलेज छत्रपती संभाजीनगर येथील उपप्राचार्य श्री श्रीकृष्ण मोरे हे उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास या विषयावर अत्यंत सखोल असे मार्गदर्शन केले त्यानंतर श्री एस. बी. तंवर मराठवाडा करियर अकॅडमी छत्रपती संभाजीनगर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले तसेच कुमारी प्रियंका लालसू ओकसा या ॲथलेट विद्यार्थिनीचा देश विदेशातील स्पर्धेकरिता आवश्यक



क्रीडा साहित्यासह संपूर्ण एक वर्षाचे खर्च घेण्याची जबाबदारी बाबत घोषणा केली. त्यानंतर श्रीमती हेमलता ठाकरे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासा बाबतचे सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर श्री. व्ही . एस . सांगळे, सहा . प्र. अधिकारी, यांनी विद्यार्थ्यास वस्तीगृहामध्ये राहत असताना आपले ध्येय कशा पद्धतीने पूर्ण करायचे व अडी अडचणीवर मात करून कसे पुढे जायचे याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले त्यानंतर डॉ. यु. के. वायाळ सहा. प्र . अधिकरी यांनी विद्यार्थ्यांना SWOT ANALYSIS पद्धतीबाबत सखोल मार्गदर्शन करून आपणच आपले भाग्यविधाते कसे होऊ शकतो याबाबत मार्गदर्शन करून प्रेरणादायी कविता सादर केले त्यास उपस्थित श्रोता विद्यार्थ्यांकडून प्रचंड दाद मिळाली. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्रीमती देवकन्या बोकडे प्रकल्प अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. आदिवासी विकास विभाग विद्यार्थ्यांना संपन्न करण्यासाठी सदैव कटिबद्ध असून शिक्षणाबरोबरच खेळातही करिअर करण्याविषयी आवाहन केले विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रकल्प कार्यालय सदर विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे व यापुढेही सदैव राहील असे प्रकल्पाधिकारी मॅडम यांनी सांगितले.

3 दिवसीय क्रिडा स्पर्धा व स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी वसतीगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी प्रचंड मेहनत घेतली . सदर कार्यक्रमाची रूपरेषा व सूत्रसंचालन वसतिगृह विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी केले . कार्यक्रमाचे अखेरचे सत्रात शेवटी या कार्यक्रमासाठी ज्यांचे अनमोल, असे सहकार्य व मार्गदर्शन लाभले, असे प्रकल्प अधिकारी, देवकन्या बोकडे, सांगळे, डॉ. उद्धव वायाळ, श्रीकृष्ण मोरे, तंवर, श्रीमती ठाकरे मॅडम, तडवी, दुबे, कोतकर, श्रीमती कुलकर्णी ,श्रीमती पुनम आखरे, श्रीमती रामटेके , श्रीमती भोगे, दीक्षित दादा, श्रीमती भोपळे मॅडम, पालवे दादा, शेजवळ दादा, देशमुख दादा,श्रीमती काळे, चिंडाले, डूलगज, कंडेरा ववसतिगृह विद्यार्थी विद्यार्थिनी कृती समिती सर्व सदस्य, याचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कवळे गुरुजी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

## अवकाळी गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान

आधुनिक केसरी न्यूज



**साईनाथ हमदे**

**उमरी :** नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय शेतकरी नेते मारोतराव कवळे यांनी बितनाळ येथील प्रगतशील शेतकरी गंगाधर मुकादमे पाटील यांच्या शेतात जाऊन टरबुज, गहू, हरभरा, आंबा,टाळकी ज्वारी, भुईमूग तिळ,मका आदि पिकांचे अवकाळी गारपीट मूळे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरी उमरी तहसील कार्यालयाचे तहसीलदार थोरात यांना फोनवर बोलून तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावा, अशी विनंती कवळे गुरुजी यांनी केली यावेळी बितनाळ गावचे सरपंच प्रतिनिधी मारोतराव उमाटे, उपसरपंच देविदास आकमवाड,माजी सरपंच मारोतराव वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य देविदास बकेवाड संतोष पाटील सुर्यवंशी, दिगांबरराव मुकदमे, अत्री पाटील, दशरथ पाटील सुर्यवंशी, आनंदराव मुकादमेसह बितनाळ गावातील असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.

# धावत्या ट्रकचे टायर निखळले; एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** मृत्यू कोणाला कुठे गाठेल, याचा काही नेम नाही. भरधाव वेगातील ट्रकने चिरडल्यामुळे मृत्यू झाल्याच्या अनेक घटना आजवर घडल्या. मात्र, ट्रकचे टायर निखळून ते रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तीला धडकल्याने त्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना जिल्ह्यात घडली आहे. धावत्या ट्रकचे टायर निखळून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तींच्या अंगावर धडकल्याने एकाचा मृत्यू तर एक जखमी झाल्याची घटना मालेगाव तालुक्यातील मेडशी येथील अंधार सावंगी फाट्यावर घडली. शेख मनसार शेख रोशन हे लग्नाला जाण्यासाठी मेडशी येथील अंधार सावंगी बस स्थानकावर गाडीची वाट पाहत उभे होते. दरम्यान, धावत्या ट्रकची दोन चाकं अचानक निखलून त्यांच्या अंगावर धडकली. यामुळे ते खाली कोसळले. मेडशी येथील आरोग्य केंद्रात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेत जुम्मा छोटू गारवे हे जखमी झाले असून कारचेसुद्धा नुकसान झाले. आर. जे. ५० जी. ए. २०११ क्रमांकाचा १४ चाकी ट्रक मालेगाववरून अकोल्याकडे जात होता. या धावत्या ट्रकचे दोन टायर अचानक निखळले. ही चाके रस्त्याच्या कडेला उभ्या शेख मनसार शेख रोशन यांना जाऊन धडकली. यात त्यांचा मृत्यू झाला.

# शासन आपल्या दारी योजना मोफत राबवावी

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरातील नागरिकांसाठी शासन आपल्या दारी ही योजना वीस दिवसांसाठी शहरात विविध ठिकाणी आयोजित केली असून १३ फेब्रुवारी २०२४ रोजी या योजनेचा शेवटचा दिवस असुन उल्हासनगर महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी ही योजना मोफत राबवावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ता प्रा सुरेश सोनवणे यांनी पत्रकार यांच्या शी बोलताना सांगितले तसेच
वंचित बहुजन आघाडीचे प्रा सुरेश सोनवणे यांनी या शिबिरात येणाऱ्या नागरिकांकडून प्रत्येक फॉर्मला १० रुपये तर आधार कार्ड आणि इतर कामांसाठी ५० ते १०० रुपये घेतले जातात. तसेच हे देण्यात येणारे दाखले १५ दिवसांनंतर दिले जाणार. तेव्हा उल्हासनगर महापालिकांचे आयुक्त अजीज शेख यांनी ही योजना मोफत राबवावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे प्रा. सुरेश सोनवणे यांनी पालिका आयुक्त अजीज शेख यांना केली आहे.
केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आभा कार्ड नोंदणी, आधार कार्ड, प्रधानमंत्री मातृत्व वंदना, पंतप्रधान स्वनिधी, जननी सुरक्षा योजना, दिव्यांग योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना, वन नेशन वन कार्ड, जन्म मृत्यू दाखला, विवाह नोंदणी व इतर अशा विविध शासकीय योजनांचे नोंदणी शिबिर २३ जानेवारी २०२४ ते १३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत शहरातील विविध ठिकाणी आयोजित केले असून या संधीचा उल्हासनगर शहरातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त अजीज शेख यांनी केले आहे.
परंतु आश्चर्य म्हणजे या शिबिरात येणाऱ्या नागरिकांकडून फॉर्म भरून घेण्यासाठी प्रती फॉर्म दहा रुपये तर आधार कार्ड व इतर कामांसाठी पन्नास ते शंभर रुपये घेतले जातात, तसेच हे देण्यात येणारे दाखले पंधरा दिवसांनंतर दिले जाणार. हे शिबिर उल्हासनगर शहरातील नागरिकांसाठी ठेवले असून महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी या शिबिरात येणाऱ्या नागरिकांकडून कोणतीही फी न घेता हे शिबिर मोफत उपलब्ध करावे अशी मागणी प्रा सोनवणे यांनी केली आहे.

# विभागीय परीक्षा रद्द करण्यात यावी

## महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेनेच्या वतीने आयुक्त यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज




**उल्हासनगर :** महाराष्ट्र नवनिर्माण उल्हासनगर महापालिका कामगार कर्मचारी सेना चे युनिट अध्यक्ष दिलीप सखाराम थोरात यांनी उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त अजिज शेख यांना निवेदन देऊन विभागीय परीक्षा रद्द करणे, अशी मागणी केली असुन या निवेदनात म्हटले की, उल्हासनगर महापालिकेत सेवा प्रवेशोत्तर/विभागीय परीक्षा घेण्यासाठी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केलेले आहे.
या आधी विभागीय परीक्षा घेण्याचा निर्णय झाला होता त्याला मात्र संघटनेने विरोध केल्याने परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या तसेच विभागीय परीक्षा घेत असाल तर या अगोदर ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्या त्यांच्या सर्वांच्या परीक्षा का घेण्यात आल्या नाही, यावर सुद्धा प्रश्नचिन्ह संघटनेने या अगोदरही सामान्य प्रशासन विभागाचे उप आयुक्त अशोक नाईकवाडे यांच्यावर आरोप केला होता तसेच सामान्य प्रशासन विभागात खूप मोठ्या प्रमाणात सावळा गोंधळ अंदाधुंदी सुरू आहे, बऱ्याच पदोन्नती दिल्या त्यांच्या परीक्षा घेतल्या जात नाही तर त्यांच्याकडून काय घेतले म्हणून आयुक्त याकडे लक्ष देत नाहीत विभागीय परीक्षा रद्द करावी, कारण सध्या स्थितीत कर्मचाऱ्यांची मनस्थिती ठीक नाही सर्वांवर कामाचा ताण तणाव व निवडणुकीचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे त्यामुळे प्रत्येक कर्मचारी कामांमध्ये व्यस्त आहेत नियम सर्वांसाठी एक असणे गरजेचे आहे म्हणून दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ ते दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी, सेवा प्रवेशोत्तर/ विभागीय परीक्षा रद्द करून सेवा जेष्ठता यादीनुसार पदोन्नती करावी जेणेकरून कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार होईल अन्यथा संघटनेच्या वतीने परीक्षा ठिकाणी आंदोलन करून परीक्षा उधळली जाईल याची काळजी प्रशासनाने घ्यावी , असे निवेदनात म्हटले आहे तसेच महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना चे युनिट अध्यक्ष दिलीप थोरात, यांनी महापालिका आयुक्त अजीज शेख आणि अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांना निवेदनाद्वारे आव्हान केले आहे निवेदनाच्या मागणीनुसार परीक्षा रद्द न झाल्यास संघटनेच्या वतीने परीक्षांच्या ठिकाणी आम्ही आंदोलन करणार अशा इशारा सुद्धा थोरात यांनी महापालिका आयुक्त यांना दिला आहे.




# समर्थ सेवामार्गाच्या वतीने देशभर 'सूर्यनमस्कार दिवस'

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्ग आणि समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर यांच्या वतीने 16 फेब्रुवारी रोजी जागतिक सूर्यनमस्कार दिना निमित्ताने देशभरातील समर्थ केंद्रावर विविध उपक्रम होणार असल्याची माहिती समर्थ गुरुपीठ संचालक चंद्रकांतदादा मोरे यांनी दिली.
माघ महिन्यातील सप्तमी म्हणजेच रथ सप्तमीच्या दिवशी देशभर व जगभर जागतिक सूर्यनमस्कार दिवस देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या प्रेरणेने मोठया उत्साहात साजरा केला जातो. समर्थ गुरुपीठाच्या माध्यमातून सुद्धा यनिमित्त आबालवृद्ध सेवेकरी विविध उपक्रमात सहभागी होतात. या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून 4 व 10 फेब्रुवारी रोजी गुरुपीठात राज्यभरातील निवडक सेवेकऱ्यांचे सूर्यनमस्कार व योगासने प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबिरांमधून 400 महिला पुरुष सेवेकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. हे सेवेकरी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन शिबीरे घेणार आहेत.
शिबिरात उपस्थित सेवेकऱ्यांशी संवाद साधताना चंद्रकांतदादा मोरे म्हणाले, "सूर्यनमस्कार आणि योगासने ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली मोठी भेट आहे. हा सर्वांगसुंदर असा व्यायाम आहे. हा व्यायाम नियमित थोडया वेळासाठी केला तरी आयुष्य, बल, बुद्धीचा विकास होतो. कार्यक्षमता वाढीस लागते. एकंदरीत आत्मिक, मानसिक, शारीरिक सामर्थ्य वाढते. मस्तक, मान, हात, पाय, बोटे, गुडघे, सांधे, कंबर, मेरूदंड असा सर्वांग व्यायाम होऊन अनावश्यक चरबी कमी होऊन आपोआप अनेक आजार शरीरातून काढता पाय घेतात."
"जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त आपणा सर्वांना हा व्यायाम योग्य पद्धतीने कसा करावा हे शिकता येईल म्हणून सर्वांनी समर्थ केंद्रात होणाऱ्या या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा" असे आवाहनही मोरे यांनी केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिक्षणाचा पाया मजबूत होणे गरजेचे : संदीप चव्हाण

## भोकरला क्रीडा स्पर्धेस प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आश्रम शाळेतील विद्यार्थी हा खेड्यापाड्यातून आलेला आहे.अशा उपेक्षित मुलाना घडविण्याचे काम शिक्षकाच आहे.शाळा हे सुसंस्कार करणारे केंद्र असल्याने माणसाला माणूसपण येत.शिक्षणा सोबतच  खेळात रममान झाल पाहिजे.शिक्षणाचा पाया जर मजबूत झाला तरच कळस गाठता येतो, असे प्रतिपादन विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण यांनी रविवारी ता (११) केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास व बहुजन कल्याण नांदेड प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक वि.जा.भ.ज.आश्रम शाळा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ केंद्रे होते तर उद्घाटक विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण होते प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अभिमन्यू केंद्रे, गटशिक्षण अधिकारी माधव वाघमारे, पत्रकार बी. आर. पांचाळ, प्राचार्य श्री .कांबळे, मुख्याध्यापक श्री. कागणे, प्रा. व्यंकट माने, पोलीस उपनिरीक्षक कराड, राजकुमार जाधव आदींची उपस्थिती होती. श्री. चव्हाण म्हणाले की,माझे शिक्षण याचं शाळेत झाले असून मला या शाळेने घडविले आहे याचा अभिमान आहे, ग्रामीण भागातील मातीतून आपण आलेले मूल आहोत आपण घडले पाहिजे. शालेय शिक्षणा सोबतच क्रीडा क्षेत्रात सहभागी व्हावे.यामूळे जीवनात वेगळा आनंद प्राप्त होतो.वृक्ष लागवड करून वृक्षाची जोपासना करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले, प्रास्ताविक प्राध्यापक नारायण कुमरे यांनी केले. आभारश्री. कंधारे यांनी मानले. तालुक्यातील आठ शाळेच्या संघानी क्रीडा स्पर्धेत भाग घेतला होता.






# कुंडलवाडी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कुंडलवाडी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त कुंडलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात फळ वाटप करण्यात आले व. संत गोरोबा आश्रम शाळा येथे शालेय विद्यार्थ्यांना वही पेन वाटप करण्यात आले आहे यावेळी नांदेड जिल्हाचे जिल्हा प्रमुख उमेश मुंडे साहेब व मधुजी गिरगावकर साहेब बाबारावजी लोकडे तालुका प्रमुख कुंडलवाडी शहर प्रमुख लक्ष्मण गंगोने शहर संघटक व्यंकट श्रीरामे युवा सेना शहर प्रमुख गंगाधर शिंदे ऊप शहर प्रमुख चंद्रशेखर भोरे ऊप शहर प्रमुख राजेश गादेवार डॉ सल्लागार शहर प्रमुख बालाजी हांमद OBC ST शहर प्रमुख सुरेश राजेडवार SC शहर प्रमुख संतोष कपाळे इस्माईल शेख ईशू आन्नाराव पाटील अजय कर्पे डिगाबर हांमद बंटी माहेवार शेखर कानकाटे आवेश पठाण व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# भोकरला विश्वकर्मा जयंतीनिमित्त भागवत कथा

## भक्तीदीदी पांचाळ यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील विराट विश्वकर्मा प्रभू मंदिराच्या कलशारोहण वर्धापन दिना निमित्त गूरूवारी ( ता. १५) शुक्रवारी (ता. २३) दरम्यान श्रीमद भागवत कथा व विश्वकर्मा जयंती सोहळा साजरा होणार असून भागवत कथा प्रवक्त्या ह.भ. प.भक्ती दीदी पांचाळ आळंदी यांच्या रसाळ वाणीतून  कथा ऐकावयास मिळणार आहे. शहरातील म्हैसा रोडवर विराट विश्वकर्मा प्रभू यांचे भव्य मंदिर उभारले असून तेथे विविध धार्मिक कार्यक्रमात घेतले जातात. मंदिर कलशारोहण तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त भागवत कथा दररोज रात्री  ८ते१० या वेळात कीर्तनाचे कार्यक्रम होतील. गूरूवारी (ता.१५ )प्रकाश महाराज कल्याने हदगाव, शुक्रवारी  (ता. १६)देविदास महाराज गीते माळाकोळी, शनिवारी (ता. १७)महाजन महाराज दगडवाडीकर, रविवारी+ ता.१८) बाबुराव महाराज  तेरकर उमरखेड, सोमवारी (ता.१९ )तुकाराम महाराज नांदेड, मंगळवारी (ता.२०) गंगाधर महाराज एकलारकर, बुधवारी (ता. २१ )राजेश्वर महाराज बोमनाळी कर यांचे कीर्तन होणार आहे. गूरूवारी (ता. २२ सकाळी ९ ते १२भक्ती दीदी पांचाळ आळंदी यांचे काल्याचे किर्तन व १२ वाजता विराट



प्रभु विश्वकर्मा जयंती उत्सव साजरा होईल. महाप्रसाद आणि काकीलवाड गुरुजी आणि त्यांचे सहकारी भजनी मंडळ सहभागी होणार आहेत. भाविकांनी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त विश्वकर्मा समाज बांधवाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अध्यात्म हा भारतीय संस्कृतीचा आत्मा; ह.भ.प. जयवंत महाराज बोधले

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताहात पाचव्या दिवशी ह.भ.प. जयवंत महाराज बोधले यांनी कीर्तनरुपी सेवेचे पुष्प गुंफले. त्यांनी कीर्तन चांग किर्तन चांग ।होय अंग हरी रूप।।या अभंगावर गोड असे निरूपण केले. ह.भ.प. बोधले महाराज यांनी कीर्तनातून वेद, पुराणशास्त्र, संत वाङ्मय इत्यादीचे पुरावे देत श्रोत्यांचे प्रबोधन केले. समाजांना वेगवेगळ्या विषयाचे संघटन, ज्ञान, अध्यात्म, समाज आणि संस्कृती यांना जीवनामध्ये मोलाचे स्थान आहे. अखंड हरीनाम सप्ताहाच्या माध्यमातून हजारो भक्त गणरायाच्या दरबारात हरिनामाशी एकरूप झाला आहे.

कीर्तन ही जीवनामध्ये आनंद आणि समाधान प्राप्त करून देणारी परंपरा आहे. या परंपरेची जोपासना राजूरकरगेल्या  57 वर्षापासून करत आहे. ज्ञानोबांचीची ज्ञानेश्वरी,जगद्गुरु तुकोबांची गाथा,नाथांचे भागवत हे वारकरी संप्रदायांचे तीन बलस्थाने आहोत.संत वाङ्मय प्रत्येक कुटुंबात पोहोचले  पाहिजे. कारण ते जीवनामध्ये योग्य रस्ता दाखवण्याचे कार्य करते. छत्रपती शिवाजी महाराज व जगद्गुरु तुकोबाराया यांच्या जीवनचरित्रातून भक्तीचा आणि शक्तीचा  एकत्रित संगम दिसून येतो. तरुणांनी निर्व्यसनी जीवनाचा अंगीकार करून अध्यात्माची कास धरावी. थोर संत व राष्ट्र पुरुषांचे आचार, विचार यांचा अंगिकार करावा, असेही जयवंत महाराज बोधले म्हणाले. सप्ताह संयोजन समितीच्या वतीने विष्णु महाराज सास्ते यांनी ह.भ.प. जयवंत महाराज बोधले यांचे स्वागत केले.




शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर